follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २४५ * सातारा, गुरूवार दि.१६ मे २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# कोण होणार औरंगाबादचा खासदार ?

## मतदानानंतर असं दिसतंय 'गणित'

**राजदंड न्यूज नेटवर्क :** संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या औरंगाबाद लोकसभा मतदार संघासाठी सोमवारी (दि. १३) मतदान प्रक्रिया पार पडली. (जिल्ह्याचे नाव छत्रपती संभाजीनगर झाले असले तरी मतदारसंघाचे नाव अद्याप बदललेलं नाही). येथे साधारणपणे ६३.७ टक्के मतदान झाल्याचे समजते. युतीचा बालेकिल्ला म्हणवल्या जाणाऱ्या या मतदारसंघात यावेळची निवडणूकही अत्यंत अटीतटीची झाल्याचे दिसते. येथे माजी खासदार तथा शिवसेना ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खरे (महाविकास आघाडी), एआयएमआयएमचे विद्यमान खासदारइम्तियाज जलीलआणि शिवसेना शिंदे गटाचे नते तथा पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदिपान भुमरे (महायुती), अशी तिरंगी आणि चुरशीची लढत बघाला मिळाली. युतीच्या या बालेकिल्ल्यात गेल्या वेळी इम्तियाज जलीलअगदी साडेचार-पाच हजार मतांनी निवडून आले होते. त्या निकालामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. यावेळची निवडणूकही तेवढीच घासून झाल्याचे दिसून आले आहे. अर्थात यावेळीही जो कुणी उमेदवार निवडून येईल तो फार अधिक फरकाने निवडून येईल असेल वाटत नाही.

**वंचित फॅक्टरचा जलिलांना फटका -**

गेल्या वेळीऔरंगाबादलोकसभा मतदारसंघात एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी यांची युती होती. या युतीचा मोठा फायदा एमआयएमला, पर्यायाने इम्तियाज जलील यांना झाला होता. खरे तर, जलीलांच्या विजयात एक गठ्ठा मुस्लीम मतदानाप्रमाणेच वंचितच्या मतांचाही सिंहाचा वाटा होता. यावेळी मात्र, एमआयएम आणि वंचित एकत्र नव्हते. वंचितने अफसर खान यांच्या उमेदवारी दिली होती. यामुळे वंचितचे मोठे मतदान अफसर खान यांच्याकडे वळताना दिसले. याशिवाय, अफसर खान यांना काही प्रमाणात मुस्लीम मतेही मिळाल्याचे दिसून आले. ते प्रमाण किती आहे, हे सांगणं कठीण आहे. परंतु, जलील यांच्यासाठी हा फटकाच असेल. याचा



फायदा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे संदिपान भुमरे आणि चंद्रकांत खैरे यांना होऊ शकतो.

गेल्या वेळी मराठा मते आणि 'वंचित'ने येथील संपूर्ण गणितच बदलून टाकले होते. यामुळे युतीच्या बालेकिल्ल्याचा बुरूज ढासळला होता. हर्षवर्धन जाधव यांना मराठा समाजाने भरभरून मतदान केले होते, तर वंचितचे एक गठ्ठा मतदान जलील यांना झाले होते. याचा मोठा फटकाचंद्रकांत खैरेयांना बसला होता. हर्षवर्धन जाधव यांनी मतं घेतल्यानेच खैरेंचा पराभव झाल्याचीही चर्चा रंगली होती. मात्र यावेळी परिस्थिती वेगळी होती. मराठा समाजाची मते पूर्वीप्रमाणे हर्षवर्धन यांच्याकडे झुकलेली दिसली नाहीत. ती विभागली जाऊन मोठ्या प्रमाणावर संदिपान भुमरे यांच्याकडे, तर काही प्रमाणावर खैरेंकडे वळल्याचा अंदाज आहे. वंचितच्या मतांचा विचार करता, सरसकट सगळी मते अफसर खान यांच्याकडे गेली का, याबद्दल वेगळी मतं आहेत. स्थानिक पातळीवर या मतांमध्येही विभाजन झाल्याचे दिसून आले आणि ती मोठ्या प्रमाणावर चंद्रकांत खैरेंकडे वळल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. याशिवाय, ओबीसी मतांचा विचार करता, बहुतांश ओबीसी मते ही संदिपान भुमरे आणि चंद्रकांत खैरे यांच्यात विभागली गेल्याची चर्चा आहे.'

मनोज जरांगे-पाटील यांनी कुठल्याही एका पक्षासाठी प्रचार केला नसला, तरी त्यांचा टोन सरकारच्या - महायुतीच्या विरोधातच दिसला. बऱ्याच ठिकाणी मराठा आंदोलकांनी आपला रोष उघडपणे व्यक्त केला. पण, छत्रपती संभाजीनगरमध्ये, म्हणजेच औरंगााबाद मतदारसंघात जरांगेंनी जोरकसपणे समर्थन किंवा विरोध केल्याचं पाहायला मिळालं नाही. त्याचा अप्रत्यक्ष फायदा भुमरेंना होऊ शकतो.

महाविकास आघाडीचे नेते चंद्रकांत खैरे यांना होणाऱ्या मतदानावर निशाणी फॅक्टरचा परिणामही नाकारता येत नाही. कारण मतदानाच्या दिवशीही धनुष्य आणि मशाल या चिन्हांच्या बाबतीत काही लोकांमध्ये कन्फ्यूजन दिसून आले. याचा थोडा बहुत फटकाही खैरेंना बसू शकतो. तर भुमरे यांना याचा फायदा होऊ शकतो .

याशिवाय चंद्रकांत खैरें यांच्या तुलनेत संदिपान भुमरे यांच्याकडे केंद्र आणि राज्य सरकारची ताकद, पाच मतदारसंघांमध्ये युतीचे आमदार आणि यंत्रणा होती. महत्त्वाचे म्हणजे, भाजपचे जबरदस्त बुथ मॅनेजमेंट, याचा भुमरे यांना जबरदस्त फायदा झाल्याचे दिसले. या उलट शिवसेनेचे दोन तुकडे झाल्याने चंद्रकांत खैरे बुथ मॅनेजमेंटमध्ये काहीसे कमकुवत दिसून आले. हे सगळे चित्र पाहता, ४ जूनला जो कुणी निवडून येईल, तो अगदी कमी फरकाने निवडून येण्याचीच शक्यता आहे. सहानुभूती पुरेशी नाही -औरंगाबाद मतदारसंघातील लढतीसंदर्भात आम्ही लोकमत छत्रपती संभाजीनगर आवृत्तीचे संपादक नंदकिशोर पाटील यांच्याशी बोललो. त्यांनी मांडलेले ठळक मुद्दे असे... वंचित बहुजन आघाडी सोबत नसल्याचा फटका जलील यांना १०० टक्के बसेल. त्यामुळे खरी लढत खैरे विरुद्ध भुमरे यांच्यातच. भुमरेंच्या पाठीशी राज्य सरकार आहे, केंद्र सरकार आहे, त्यांचे पाच आमदार या मतदारसंघात आहेत.

त्यामुळे त्यांचे बलाबल तुलनेने खैरेंपेक्षा अधिकच आहे. उद्धव ठाकरेंच्या बाबतीत जी सहानुभुती आहे ती खैरेंना होती. पण केवळ सहानुभुतीवर निवडणूक लढवली जाते असे वाटत नाही. त्याला संसाधनांचीही गरज असते. त्यात ते थोडे मागे पडले.

## मुंबईत मोदींचा रोड शो, भाजपचे मोठं शक्तीप्रदर्शन !

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी २० मे रोजी मतदान पार पडणार आहे. कल्याण, मुंबई, ठाणे, नाशिक, धुळे, दिंडोरी या मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. प्रचारसाठी अवघा काही दिवसांचा कालावधी शिल्लक असतानाच आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कल्याणात जाहीर सभा झाली तर मुंबईत रोड शो पार पडला. मोदींच्या रोड शोच्या माध्यमातून भाजपचे मोठं शक्तीप्रदर्शन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज घाटकोरपमध्ये मोठा रोड शो आयोजित करण्यात आला. अशोक सिल्क मिल ते हवेली ब्रीज असा रोड शो काढण्यात आला. या रोड शोला हजारो नागरिकांनी गर्दी केली होती. या रोड शोमध्ये महिला, वृद्ध आणि लहान मुलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. मोदींनी सर्वात आधी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला वंदन केलं. यानंतर त्यांच्या रोड शोला सुरुवात झाली. या रोड शोमध्ये मोदी यांच्यासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर नेते सहभागी होते. या रोड शोच्या प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या माध्यमातून मोदींचं स्वागत करण्यात आलं.

येत्या २० मे ला राज्यात शेवटचं पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडणार आहे. या शेवटच्या टप्प्यात एकूण १३ जागांवर मतदान होणार आहे. यापैकी सहा मतदारसंघ हे मुंबईतील आहेत. मोदींनी त्यांच्या आजच्या दौऱ्यातून या सर्व जागांचा प्रचार करण्याचा प्रयत्न केला. मोदींची आज नाशिकमध्ये सभा पार पडली. त्यानंतर कल्याणमध्ये सभा पार पडली. यानंतर मुंबईत मोदी यांचा पहिलाच रोड शो पार पडला.

## केरळात मान्सून कधी येणार ?



**मुंबई :** मे महिन्याची १५ तारीख संपल्यानंतर सर्वांना मान्सूनबाबत उत्सुकता लागलेली असते. मागील वर्षी पाऊस कमी प्रमाणात झाल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं. काही दिवसापूर्वी हवामान विभागाने मान्सूनबाबत अपडेट दिली होती. आता आणखी एक नवीन अपडेट दिली आहे. या वर्षी मान्सूनची सुरूवात लवकर होऊ शकते. हवामान विभागाने तारीखही जाहीर केली आहे. केरळमध्ये ३१ मे च्या सुमारास मान्सून सुरू होण्याची शक्यता आहे. उत्तर-पश्चिम भारतात १६ मे आणि १८ मे पासून पूर्व भारतात उष्णतेची लाटेचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

## होर्डिंग मालकासह सर्व दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

### अंबादास दानवेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई :** घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेप्रकरणी होर्डिंग मालकासह मुंबई महानगरपालिका, रेल्वे पोलीस आणि महाराष्ट्र पोलीस गृह निर्माण संस्थेतील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मुंबईतील घाटकोपर येथील छेडानगर परिसरात लोखंडी जाहिरात फलक वादळी वाऱ्यामुळे कोसळून पेट्रोल पंपावर पडल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत वाहने आणि शंभरहून अधिक नागरिक अडकले गेले. त्यापैकी १८ जणांचा दुर्दैवी मृत्यू तर किमान ७८ जखमी झाले. या घटनेनंतर महानगर पालिकेच्या होर्डिंग धोरणांची पोलखोल झाली आहे. मुंबईत सुमारे ४० द ४० आकाराचे होर्डिंग लावण्यास परवानगी असताना, १२० द १२० चौरस फूट आकाराचे होर्डिंगला परवानगी दिल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे नियमबाह्य पध्दतीने परवानगी दिलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच ही जागा रेल्वे पोलिसांच्या हद्दीत येते. रेल्वे पोलीसांनी देखील बेकायदेशीर होर्डिंगला मान्यता दिली आहे. त्यामुळे परवानगी दिलेल्या संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांची चौकशीचे आदेश द्या. महाराष्ट्र पोलीस गृह निर्माण संस्थेच्या देखील जागेचा काही भाग होता. या सर्व यंत्रणांनी डोळेझाक करत, होर्डिंग लावण्यास मान्यता दिली. या सर्व अधिकाऱ्यांवर बेजबाबदारपणाचा ठपका ठेवून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. नियमबाह्य पद्धतीने होर्डिंग लावल्याप्रकरणी त्या मालकाला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी दानवे यांनी केली.

दुर्घटनेतील जखमी आणि मृत पावलेल्या व्यक्तींना संबंधित होर्डिंग मालकाकडून आर्थिक मदत मिळवून द्यावी. भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी राज्यातील सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे. धोकादायक होर्डिंग काढण्याबाबत योग्य सूचना द्याव्यात. तसेच जखमी झालेल्या व्यक्ती, मृत व्यक्तींच्या वाहने आणि इतर स्थावर मालमत्तेच्या नुकसानीची शासनाने तातडीने भरपाई करून द्यावी, असे दानवे यांनी पत्रात म्हटले आहे.

# खरीप हंगामासाठी मुबलक खते

## राज्याला किती खत मिळणार ?

**पुणे :** यंदाच्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाने ४४.५६ लाख टन रासायनिक खतांचा साठा मंजूर केला आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपर्यंत राज्यात २९.१९ लाख टन खतांचा साठा होता. उर्वरित खतांचा पुरवठा केंद्राकडून होणार आहे. हंगामात खतांचा तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी कृषी विभागाने काटेकोर नियोजन केले आहे.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कृषी विभागाने खरीप हंगाम २०२४ साठी ४८ लाख टन खतांचा प्रस्ताव दिला होता, त्यापैकी ४५.५३ लाख टन खतसाठा मंजूर करण्यात आला आहे. ४५.५३ लाख टनांमध्ये युरिया १३.७३ लाख नट, डीएपी ५ लाख टन, एमओपी १.३० लाख टन, संयुक्त खते १८ लाख टन आणि ७.५० लाख टन एसएसपी खतांचा समावेश आहे.

मे महिन्याच्या सुरुवातीपर्यंत राज्यात २९.१९ लाख टन खतांचा साठा होता. त्यात ८.९८ लाख टन युरिया, १.५२ लाख टन डीएपी, ०.७२ लाख टन एमओपी, १२.१९ लाख टन संयुक्त खते आणि ४.९८ लाख



टन एसएसपी खतांचा समावेश आहे.

वर्षाला ६५ लाख टनांची गरज

राज्याला एका वर्षाला सरासरी ६५ लाख टन रासायनिक खतांची गरज असते. त्यापैकी खरीप हंगामात सरासरी ३८ लाख टन आणि रब्बीत २७ लाख टन खतांचा वापर होतो. मागील पाच वर्षांतील सरासरीचा विचार करता, २०१९-२० मध्ये ६१.३३ लाख टन, २०२०-२१ मध्ये ७३.६७ लाख टन, २०२१-२२ मध्ये ७०.६७ लाख टन, २०२२-२३ मध्ये ६४.७३ लाख टन आणि २०२३-२४ मध्ये ६४.५७ लाख टन खतांचा वापर करण्यात आला होता.

खतांच्या मागणीत वाढ का ?

राज्यासह देशभरात सेंद्रीय, जैविक खतांच्या वापराला चालना दिली जात आहे. त्यासाठी विविध योजनाही राबविल्या जात आहेत. पण, प्रत्यक्षात रासायनिक खतांच्या वापरात दिवसोंदिवस वाढच होत आहे. राज्यात फुले, पालेभाज्या, फळभाज्यांसह विविध प्रकारच्या फळांची, नगदी पिकांची शेती केली जाते. त्यासाठी शेतकरी रासायनिक खतांच्या वापराला प्राधान्य देतात. वर्षांनुवर्षांच्या शेती उत्पादनांमुळे जमिनीचा कस कमी होत आहे. जनावरांची संख्या घटल्यामुळे शेणखताचा वापर घटला आहे. सेंद्रीय, जैविक खतांच्या वापराला मर्यादा आहेत. त्यामुळे राज्यात रासायनिक खतांचा वापर वाढत आहे, अशी माहिती खत उद्योगाचे अभ्यासक विजयराव पाटील यांनी दिली.

राज्यात खरीप हंगामासाठी पुरेशा खतांची उपलब्धता आहे. हंगामात खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून काळाबाजार होऊ नये, यासाठी कृषी विभाग सतर्क आहे. सरकारने ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षा जास्त दराने खत विक्री केल्याचे आढळून आल्यास. काळाबाजार होत असल्यास तातडीने कृषी विभागाशी संपर्क करावा, असे अवाहन कृषी विभागाचे निविष्ठा व गुण नियंत्रण विभागाचे संचालक विकास पाटील यांनी केले आहे.

## सरकार बनवल्यानंतर शंभर दिवसाची ब्ल्यू प्रिंट तयार : नरेंद्र मोदी

**कल्याण :** सरकार बनल्यानंतर पहिल्या शंभर दिवसात काय काम करणार यासाठी नियोजन केलं आहे. शंभर दिवसाची ब्ल्यू प्रिंट तयार केली आहे. देशातील तरूणाकडे नवीन कल्पना आहे. प्रत्येक गोष्ट नावीन्य आहे. यामुळे मी प्रभावित झालो आहे. तुम्ही मला नवीन कल्पना लिहून पाठवा, त्यातील निवडक कल्पनांवर आम्ही काम करू आणि विकास करू असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कल्याणात महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठीच्या जाहीर सभेत दिला. यावेळी मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली.

कल्याण भिवंडी आणि ठाण्याचे महायुतीचे उमेदवार डॉ श्रीकांत शिंदे, कपिल पाटील आणि नरेश म्हस्के यांच्यासाठी कल्याणात मोदींची जाहीरसभा पार पडली त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीतून भाषणाला सुरूवात केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीला माझा नमस्कार करतो. बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेंना श्रध्दांजली अर्पण केली. मोदी म्हणाले की, भारतात आपण नवीन आत्मविश्वास बघत आहोत. आज जेवढी मेहनत करतो तेवढीच मेहनत, ४ जूननंतर पण सुरू राहणार आहे. सरकारचं ब्ल्यू प्रिंट रेडी आहे. मी काशीमध्ये होतो. त्यावेळी मी पाहिलं देशातील तरुणाकडे नवीन कल्पना आहेत. प्रत्येक गोष्ट नावीन्य आहे. यामुळे मी प्रभावित झालो आहे. तुम्ही मला नवीन कल्पना लिहून पाठवा, त्यातील निवडक कल्पनांवर आम्ही काम करू आणि विकास करू, असंही पंतप्रधानांनी यावेळी नमूद केलं आहे.

मोदी पुढे म्हणाले, तुमची स्वप्ने हा मोदींचा संकल्प आहे. माझा प्रत्येक क्षण आणि तुमच्यासाठी आणि देशासाठी असेल. आज भारत ज्या उंचीवर पोहचला आहे, तिथून पुढे देशाला कोण घेऊन जाऊ शकतो. ज्यांनी गरिबी हटवण्याचा खोटा नारा दिला आणि गरिबीची माला जपली आहे. भ्रष्टाचार केले, असे लोक देशाला पुढे घेऊन जाऊ शकतात का. मागच्या सरकारमध्ये ब्रेक लागला होता. मात्र ब्रेक हटवला आणि फास्ट गाडी घेऊन गेली. काँग्रेस कधीच विकासाचा विचार करू शकत नाही, अशी टीका मोदींनी काँग्रेसवर केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, नरेंद्र मोदी हे जनतेच्या हृदयातील प्रधानमंत्री आहेत, यापुढे असा प्रधानमंत्री होणार नाही. मोदीजी हे हिंदुस्थानचा अभिमान आणि गौरव आहेत.

# दरडग्रस्त गावांचे भुवैज्ञानिकांकडून सर्वेक्षण

## भुवैज्ञानिकांनी केलेल्या सर्वेक्षणात रायगड जिल्ह्यातील १०३ गावांना दरडी कोसळण्याचा धोका

**अलिबाग :** भुवैज्ञानिकांनी केलेल्या सर्वेक्षणात रायगड जिल्ह्यातील १०३ गावांना दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या संभाव्य दरडग्रस्त गावांना पावसाळ्याच्या पार्श्वभुमीवर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरडग्रस्त गावात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश जियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या वैज्ञानिकांनी दिले आहेत.

जिल्ह्यात २००५ मध्ये झालेल्या भुस्खलनाच्या घटनांमध्ये २१२ हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. २०२१ मध्ये तळीये गावावर दरड कोसळली होती. ज्यात ८४ जणांचा मृत्यू झाला होता. तर गेल्या वर्षी इरशाळवाडी येथे दरड कोसळून ८४ जण दगावले होते. सातत्याने होणाऱ्या या घटनेची दखल घेऊन जिल्ह्यातील संभाव्य दरडग्रस्त गावाचे जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या भूवैज्ञानिकांमार्फत सर्वेक्षण करण्ययात आले होते. यात प्रामुख्याने



डोंगर उतारावरील गावांचा समावेश होता. नैसर्गिक धोके सौम्यीकरण पथदर्शी प्रकल्पा आंतर्गत ही पहाणी करण्यात आली होती.

या आंतर्गत सरवातीला जिल्ह्यातील ८४ गावांचा दरडग्रस्त गावांमध्ये समावेश करण्यात आला होता. मात्र आता ही संभाव्य दरडग्रस्त गावांची संख्या १०३ वर पोहोचली आहे. रायगडमधील ९ गावे (वर्ग १) अतिधोकादायक, ११ गावे (वर्ग २) धोकादायक व ८३ गावे वर्ग ३) सौम्य धोकादायक आहेत.

डोंगर उताररावरील वृक्ष तोड, बेकायदा खोदकाम, पाण्याचा निचरा होणार्या मार्गात अडथळे, पावसाळी हंगामात जमिनीस भेगा पडणे, अस्थिर भूभागावरील बांधकाम ही दरड कोसळण्याची प्रमुख कारण आहेत असल्याचे या सर्वेक्षणात दिसून आले आहे. पुणे येथील भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (जीएसआय) विभागाच्या शास्त्रज्ञांनी या गावांना भेट देऊन पहाणी केली. या पहाणीत शास्त्रज्ञांच्या अनेक धक्कादायक बाबी नजरेसमोर आल्या आहेत. त्याचा अहवाल शासनाला पाठविण्यात आला आहे.

दरम्यान १०३ दरडग्रस्त गावांमध्ये अनेक उपाययोजना करण्यात याव्यात यासाठी भूवैज्ञानिकांनी काही सुचना केल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

तालुकानिहाय संभाव्य दरडग्रस्त गावे

महाड- ४९
पोलादपुर- १५
रोहा- १३
म्हसळा- ६
माणगाव- ५
पनवेल- ३
खालापूर- ३
कर्जत- ३
सुधागड- ३
श्रीवर्धन- २
तळा- १

भूवैज्ञानिक यांनी सुचवलेल्या उपाययोजना

जिल्ह्यातील संभाव्य दरडग्रस्त गावांमधील धोका कमी करण्यासाठी भूवैज्ञानिकांनी काही उपाययोजना सुचविल्या आहेत. यात प्रामुख्याने या परीसरातील खाणकाम आणि उत्खननावर निर्बंध घालण्यात यावे, डोंगर उतारावर वृक्ष तोडण्यास मज्जाव करण्यात यावा, पावसाळ्यापुर्वी डोंगर उतारवर सैल झालेले दगड हटवण्यात यावेत. डोंगर उतारावरील पाण्याचा निचरा वेगाने व्हावा यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, आणि दरड रोधक भिंतीची उभारणी करण्यात यावी.

अतिधोकादायक श्रेणी आणि धोकादायक श्रेणीतील नागरिकांना पावसाळ्यापूर्वी सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या गावांमध्ये करावयाच्या उपययोजनांबाबत तातडीने पाऊले उचलण्यास सांगण्यात आले आहे.

# संपादकीय

## अफवा आणि संशयाच्या भोवऱ्यात बाजार

.लोकसभा निवडणुकीत काय होईल, याची चिंता सर्वसामान्यांना कमी आणि शेअर बाजाराला जास्त अशी सध्याची स्थिती आहे. लोकसभा निवडणुकीतील चार टप्प्यांचे मतदान पार पडले आहे. लोकसभेच्या ३७९ जागांवरचे मतदान पूर्ण झाले असताना आता १६४ जागांवरचे मतदान राहिले आहे. अशा स्थितीत खरेतर देशाची सत्ता कुणाच्या हाती येईल, याचा पुरेपूर अंदाज यायला हवा होता; परंतु तसे झालेले नाही. सत्ताधारी भाजप जरी 'चारसो पार'ची भाषा करीत असला, तरी प्रत्यक्षात त्याच्या मनातही धाकधूक असावी, असे एकूण चित्र आहे. त्यामुळे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या नेत्यावर अडीचशे किलोमीटरच्या परिघात सहा-सात सभा घेण्याची वेळ आली आहे. चार टप्प्यानंतर आता निवडणुकीच्या प्रचाराची भाषा बदलली आहे. आम्ही आणि ते अशी सरळसरळ विभागणी सुरू झाली आहे. गेली नऊ वर्षे दाबून ठेवलेला हिंदू जनसंख्या घटत असल्याचा अहवाल एकदम निवडणुकीचे तीन टप्पे जाहीर झाल्यानंतर बाहेर काढण्याची गरज ज्या अर्थी भासली, त्या अर्थी अंडर करंट वेगळे काही असल्याचे संकेत सरकारला मिळाले असले पाहिजेत. सरकारच्या एवढया यंत्रणा असताना त्यांनी सरकारला गोपनीय अहवाल दिलाच असेल. विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक होण्याऐवजी सत्ताधारी पक्षच विरोधकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून जुनी पुरलेली आरोपांची मढी उकरून काढीत आहे. देशात एकपक्षीय बहुमताचे सरकार असले, तर त्याच्या निर्णयात सातत्य असते. आर्थिक सुधारणांच्या दिशेने पावले टाकता येतात. चार वर्षे लोकानुनयाची गरज लागत नाही. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला शिस्त लागते. देशातील तसेच परदेशातील गुंतवणूकदार निवडणुकीनंतर कोणते आणि कसे सरकार येणार आहे, याचा विचार करून गुंतवणूक करीत असतात. गेल्या आठवड्याभरात शेअर बाजारात जी अस्थिरता आली, ती लोकसभा निवडणुकीनंतर कोणते सरकार येणार या अस्वस्थेतून. जागतिक प्रतिकूल घटना नाहीत. मॉन्सून वेळेवर आणि चांगला होणार आहे. असे असताना भारतात शेअर बाजारात जास्त अस्थिरता आहे. एखाद दुसऱ्या दिवसाचा अपवाद वगळता सारखी पडझड चालू आहे. इतर बचतीचे प्रमाण कमी होत असताना आता एसआयपी आणि गुंतवणुकीचे अन्य मार्ग शोधणाऱ्या नवगुंतवणूकदारांचा भ्रमनिरास होणार नाही, असा परतावा आणि स्थैर्य त्याला हवे आहे. त्याची ही अपेक्षाही पुन्हा सरकार कोणते आणि कसे येणार यावरच अवलंबून आहे. निवडणूक विश्लेषकांपेक्षाही निवडणुकीतील सट्टेबाजार यात मोठी भूमिका बजावत असतो. त्यातील वेगवेगळ्या ठिकाणचे अंदाज भ्रम निर्माण करीत आहेत. त्याचाही बाजारावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सट्टाबाजार चांगलाच तापला आहे. अफवांच्या महापुरामुळे तज्ज्ञदेखील संशयाच्या भोवऱ्यात आणि चिंताग्रस्त आहेत. बेंचमार्क सेन्सेक्स गेल्या गुरुवारी एक हजाराहून अधिक अंकांनी घसरला आणि शेअर बाजाराचा भीती निर्देशांक एप्रिलनंतर वाढला. या आठवड्यात १९ महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला. सोमवारी गृहमंत्री अमित शाह यांनी गुंतवणूकदारांना आश्वासन दिले, की चार जूननंतर बाजारात तेजी येईल. डेटावर अवलंबून असलेले नागरिक, कॉर्पोरेट दिग्गज आणि गुंतवणूक बँकर्स स्पीड-डायलिंग आणि गुगलिंग करत आहेत आणि अफवा आणि प्रतिकूल टिप्पण्यांवर बारीक नजर ठेवतात. लोकसभेच्या जागांच्या बहुविध आकडेमोडीमुळे बाजार चिंतेत आहे. प्रामुख्याने कर्नाटक, महाराष्ट्र आणि बिहारवर लक्ष केंद्रित केले आहे, जिथे भाजपने गेल्या वेळी ११६ पैकी ६५ जागा जिंकल्या होत्या. भाजप याची पुनरावृत्ती करू शकेल का? या राज्यांमध्ये पक्षाचे नुकसान झाले तर आंध्र प्रदेश, ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये ते नुकसान भरून काढणार का? बिहारमधील जागांवर नितीश यांचा प्रभाव पडणार असल्याची चर्चा कॉर्पोरेट जगतात आहे. अर्थात मागच्या वेळीही विरोधकांना तिथे दोनच जागा होत्या. महाराष्ट्रात भाजपच्या होणाऱ्या नुकसानीचे मूल्यांकन केले जात आहे. गुजरातमधील संभाव्य नुकसान, राजस्थानमधील चार-पाच जागांवर अनिश्चितता आणि दिल्लीतील

केजरीवाल यांचा प्रभाव याबद्दलही त्यांना जाणून घ्यायचे आहे. कर्नाटकात काँग्रेसच्या हमी मोदींच्या हमीपेक्षा जास्त आहेत का, असा प्रश्न त्यांना पडला आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये एका ज्येष्ठ इन्व्हेस्टमेंट बँकरने प्रश्न उपस्थित केला होता, की भाजप पुन्हा सत्तेत न येण्याचा धोका आहे का? हे अवघड कोडे पाटण्यात विरोधी आघाडी स्थापन झाल्यानंतर उलगडले. दहा वर्षांच्या शासनाविरुद्ध सत्ताविरोधी कल नेहमीच आव्हानात्मक असतो; परंतु भाजपने त्याची धार कमी केली आहे. भाजपने सर्व शंका दूर करत राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या विधानसभा निवडणुका जिंकल्या. फेब्रुवारी २०२४ मध्ये भाजपने 'चारसो पार'ची घोषणा केली. त्यामागे अयोध्येतील राम मंदिरात रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा आणि आणि समान नागरी संहितेच्या आश्वासनाने भाजपच्या मूळ मतदारांना सक्रिय केले होते. निवडणुकीनंतरच्या पहिल्या चार टप्प्यातील चित्रानंतर भाजपचा विजयाचा वारू पूर्वीइतक्या वेगाने धावणार नसल्याचा अंदाज आता सर्वांना यायला लागला आहे. एप्रिलच्या पहिल्या दोन आठवड्यापर्यंत शेअर बाजारचे निर्देशांक नवीन उच्चांकावर गेले; परंतु नंतर मे महिन्याच्या सुरुवातीलाच भाजपच्या जागा कमी होण्याचा अंदाज व्यक्त होऊ लागला आणि त्यामुळे बाजार अस्थिरतेच्या हिंदोळ्यावर झुलायला लागला.

भाजपच्या प्रचाराच्या रणनीतीत झालेल्या बदलाबाबत पंटर आणि सर्वसामान्यांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. पहिल्या टप्प्यात कमी मतदानाचा अंदाज घेऊन, भाजपने मोठ्या प्रमाणात ध्रुवीकरणाच्या राजकारणावर जोर दिला.दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी तुरुंगातून अंतरिम जामीनावर सुटल्यानंतर मोदी यांच्या वयाचा आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला. भाजपने यापूर्वी आंनदीबेन पटेल, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, सुमित्रा महाजन यांना सक्रिय राजकारणातून सक्तीने दूर केले. यापैकी काहींची मार्गदर्शक मंडळात वर्णी लावण्यात आली. बी. एस. येदियुरप्पा यांच्यासाठी वयाचा मुद्दा बाजूला ठेवण्यात आला; परंतु त्यांनाही नंतर पदावरून जावे लागले. या पार्श्वभूमीवर आता मोदी यांचा अपवाद करण्याची भाषा केली जात असेल, तर भाजपत त्यामुळे एकवाक्यता नाही आणि नियम काही लोकांपुरतेच असतात, असा संदेश जायला लागला आहे. त्याचाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम बाजारावर होतो. संघ परिवारातील मतभेदांचे मुद्देही वारंवार उपस्थित केले जात आहेत. मोदी सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुख आकांक्षा पूर्ण केल्या, ही धारणाही वादग्रस्त आहे. सट्टेबाज, पोलस्टर आणि राजकीय पंडितांमधील वादविवाद म्हणजे कथन आणि रणनीतीतील बदल भाजपच्या मूळ मतदारांना बळकट करेल किंवा भाजपपासून दुरावलेल्या मतदारांना बळ देईल. हे लोकांचे प्रश्न मतदानाच्या हेतूबद्दल कमी आणि बाजाराच्या परिस्थितीबद्दल अधिक आहेत. अद्याप कोणीही मोठ्या उलथापालथीचा अंदाज लावला नाही. लोकसभा निवडणुकीचा निकाल २०१४ च्या जागांच्या जवळपास असेल, असा अंदाज आहे;मात्र धारदार हल्ल्यांमुळे भाजप कमकुवत झाल्याचा समज समर्थक आणि विरोधकांमध्ये निर्माण होत आहे, हे नाकारता येणार नाही. पक्षीय राजकारण आणि पक्षाच्या भवितव्याबाबत होत असलेल्या कथनामुळे निवडणूक प्रचाराच्या गुणवत्तेबाबत चिंता निर्माण झाली आहे. भारत ही सर्वात मोठी लोकशाही आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीमध्ये ९६ कोटींहून अधिक मतदार त्यांच्या पसंतीचे सरकार निवडण्यास पात्र आहेत. यापैकी १.८ कोटी लोक प्रथमच मतदान करत आहेत. चौथ्या टप्प्यातील लोकसभेच्या ९६ जागांसाठी मतदान पार पडले. यापूर्वी २८५ मतदारसंघात मतदान झाले आहे. सैद्धांतिकदृष्ट्या, निवडणूक प्रचार म्हणजे स्पर्धात्मक अडचणी आणि विरोधाभासी संकटांची कोंडी सोडवणे. त्याऐवजी सर्वच पक्ष प्रचारादरम्यान दावे-प्रतिदावे आणि खुलासे-नकार करत आहेत. घोषणांच्या गोंगाटामुळे मतदारांचा उत्साह कमी झाला आहे. नोबेल पारितोषिक विजेते हर्बर्ट सायमन एकदा म्हणाले होते, की जास्त माहिती फोकसची कमतरता निर्माण करते. सायमनने मांडलेला हा सिद्धांत अपूर्ण माहितीचा परिणाम आणि परिणामांवर होणारा परिणाम सार्वजनिक धोरणनिर्मितीतून निर्माण झाला आहे.

## दबाव कोणाचा, खुलासा करा !

### प्रकाश आंबेडकरांचे उज्वल निकम यांना सवाल



**मुंबई** : २६/११ च्या आंतकवादी हल्ल्यात करकरे, साळसकर, कामटे यांच्यासह पाच पोलीस कर्मचारी शहिद झाले. पोलीस अधिकाऱ्यांवर कोणी गोळीबार केला. कोणत्या धार्मिक संघटनेला वाचविण्यासाठी नावे समोर आली नाहीत, असा सवाल वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी करत पुन्हा एकदा भाजपचे उमेदवार उज्वल निकम यांना लक्ष्य केले. त्यावेळी दबाव होता, आता लोकसभेचे उमेदवार असल्याने त्यावर खुलासा करावा, अशी जोरदार मागणी बुधवारी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

ड. आंबेडकर म्हणाले की, परकियांकडून देशाच्या एकतेला धोका आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी सुध्दा संविधान सभेतील शेवटच्या भाषणात देशात जयचंद किती निर्माण झाले आणि या भारताला स्वतंत्र अस्तित्व गमवावे लागले, त्याची उदाहरणे त्यांनी दिले आहेत. त्यानुसार निकम यांनी २६/११ मध्ये नेमकं काय घडलं ? हे लोकांना प्रामाणिकपणे सांगावे. कोणत्या धार्मिक संघटनेला वाचवण्यासाठी, कोणत्या व्यक्तीला वाचवण्यासाठी करकरे, साळसकर, कामटे आणि पाच पोलीस कर्मचाऱ्यांचे पुरावे सादर केले नाहीत. त्याकाळी तुमच्यावर दबाव असू शकतो. आता लोकसभेचे उमेदवार म्हणून तुमच्यावर कोणताही दबाव नाही. त्यामुळे प्रामाणिकपणे पुरावे न देण्याच्या सूचना कोणी दिल्या होत्या हे जाहीर करावे, असे आवाहन केले.

२६/११ च्या हल्ल्यामागील एक हल्ला आहे. ज्याने कोणी पोलीसांवर हल्ला केला, त्याला पाकिस्तान हल्ला करणार हे माहित होते. त्याचा पाकिस्तानशी संबंध असून भाजप तो का उलगडत नाही ? असा संतप्त प्रश्न आंबेडकर यांनी भाजपला विचारला. तसेच तुम्ही राष्ट्राशी प्रामाणिक नाही तर मतदारांनी तुम्हाला का मतदान करावं? असाही सवाल त्यांनी केला. आंबेडकर यांच्यामुळे निकम यांची चांगलीच कोंडी झाली आहे.

## ऑनलाइन सट्टा प्रकरणी जिल्हा पोलीस प्रशासनाची मोठी कारवाई

**नारायणगाव :-** ऑनलाइन सट्टा प्रकरणी पुणे ग्रामीण पोलीसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे छापा टाकून सुमारे ९० ते १०० जणांना ताब्यात घेतले आहे.

परदेशासह देशातील इतर राज्यातल्या छापेमारी नंतर ऑनलाइन बेटिंग प ची पाळंमुळं पुणे जिल्ह्यातील नारायणगाव मध्ये सुरू असल्याचे निष्पन्न झाले आहे. नारायणगावातील एका इमारतीत हे काम सुरु होते. संपुर्ण तीन मजली इमारत या सट्टेबाजीसाठी वापरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मंगळवारी दि. १४ रोजी रात्री ११ वाजता येथे छापा टाकून कारवाई करण्यात आली.

दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी नारायणगावातील या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या व्हिजन गॅलेक्सी कॉम्प्लेक्स परिसरातील इमारती मध्ये असलेल्या सट्टा केंद्राला चौकशी निमित्त भेट दिली. त्यांच्यासोबत अतिरिक्त पोलीस अधीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच सायबर क्राईम व स्थानिक पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दरम्यान येथे चालू असलेला हा सट्टा बाजार कोणाच्या आशीर्वादाने सुरू होता तसेच या इमारतीच्या मालकावर कारवाई होणार का असा सवाल देखील स्थानिक नागरिकांनी केला असून इथे काही दिवसात या सट्टेबाजारामध्ये किती कोटी रुपयांची उलाढाल झाली असावी हे समजू शकणार आहे.

दरम्यान नारायणगावातील मुख्य सूत्रधार ऋत्विक सुरेश कोठारी व जुन्नर येथील बोकरिया (पूर्ण नाव समजू शकले नाही) यांच्यासह सुमारे ९० ते १०० जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख यांनी सांगितली.

ही संपूर्ण सट्टेबाजी महादेव बेटिंग प व लोटस ३६५ या पद्वारे तसेच विविध वेबसाईट द्वारे बेटिंग घेतले जात होते. या प्रकरणी पैसे काढणे पैसे भरणे ही प्रक्रिया नारायणगाव येथे कॉल सेंटर अथवा बीपीओ सेंटर प्रमाणे सुरू होती या प्रकारामध्ये परराज्यातील युवकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असून याची पाळंमुळं किती खोलवर रूजली आहेत हे येत्या दोन-तीन दिवसांनी स्पष्ट होईल अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

## मुंबई उपनगर जिल्ह्यात ७४ लाख ४८ हजार मतदार

**मुंबई** : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील चारही मतदारसंघात सोमवार २० मे २०२४ रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा यावेळेत मतदान होणार आहे. या मतदानाची सर्व तयारी जिल्हा प्रशासनाने पूर्ण केली आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात ७४ लाख ४८ हजार ३८३ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील, अशी माहिती निवडणूक शाखेने दिली आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यात लोकसभेचे २६- मुंबई उत्तर, २७- मुंबई उत्तर पश्चिम, २८- मुंबई उत्तर पूर्व, २९- मुंबई उत्तर मध्य या मतदारसंघांचा समावेश आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात एकूण सात हजार ३८४ मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभेच्या निवडणुकीसाठी मतदानाची तयारी पूर्णत्वास आली आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील २६ मतदारसंघात एकूण ७३८४ मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर ४० लाख २ हजार ७४९ पुरुष तर ३४ लाख ४४ हजार ८१९ महिला, आणि ८१५ तृतीयपंथी असे एकूण ७४ लाख ४८ हजार ३८३ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

२६- मुंबई उत्तर मतदारसंघात विधानसभेचे बोरिवली, दहिसर, मागाठाणे, कांदिवली (पूर्व), चारकोप, मालाड (पश्चिम) या मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात एकूण १७०२ मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर ९ लाख ६८ हजार ९८३ पुरुष, तर ८लाख ४२ हजार ५४६ महिला, तसेच ४४३ तृतीयपंथी असे एकूण १८ लाख ११ हजार ९४२ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील.

२७- मुंबई उत्तर पश्चिम या मतदारसंघात विधानसभेचे जोगेश्वरी पूर्व, दिंडोशी, गोरेगाव, वर्सोवा, अंधेरी पश्चिम आणि अंधेरी या मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात १७५३ मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर ९ लाख ३८ हजार ३६५ पुरूष मतदार तसेच ७ लाख ९६ हजार ६६३ महिला मतदार तर ६० तृतीयपंथी असे एकुण १७ लाख ३५ हजार ८८ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील.

२८- मुंबई उत्तर पूर्व या मतदारसंघात विधानसभेचे मुलुंड, विक्रोळी, भांडुप पश्चिम, घाटकोपर पश्चिम, घाटकोपर पूर्व तसेच मानखुर्द शिवाजीनगर या मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात १६८२ मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर ८ लाख ७७ हजार ८५५ पुरूष मतदार तसेच ७ लाख ५८ हजार ७९९ महिला मतदार तर २३६ तृतीयपंथी असे एकूण १६ लाख ३६ हजार ८९० मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील.

२९- मुंबई उत्तर मध्य या मतदारसंघात विधानसभेचे विलेपार्ले, चांदीवली, कुर्ला एससी, कलीना, वांद्रे पूर्व, वांद्रे पश्चिम या मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात १६९८ मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर ९ लाख ४१ हजार २८८ पूरूष मतदार तसेच ८ लाख २ हजार ७७५ महिला मतदार तर ६५ तृतीयपंथी असे एकूण १७ लाख ४४ हजार १२८ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील.

३० - मुंबई दक्षिण मध्य या मतदारसंघात अणुशक्ती नगर आणि चेंबुर या मतदारसंघात ५४९ मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर २ लाख ७६ हजार २५८ पूरूष मतदार तसेच २ लाख ४४ हजार ३६ महिला मतदार तर ४१ तृतीयपंथी असे एकूण ५लाख २० हजार ३३५ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील.

## संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरातील होर्डिंगचे सुरक्षेचा द्रुष्टीने स्ट्रक्चर ऑडीट करण्यात यावे : नाना काटे

**पिंपरी चिंचवड :** नुकत्याच मुंबई येथील घाटकोपर परिसरात होर्डिंग दुर्घटना झाली त्यात निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे, हि खूप दुख:द व गंभीर बाब असून प्रशासनाच्या दुर्लक्ष व हलगर्जी पणामुळे हि घटना घडली आहे, याच धर्तीवर आपल्या पिंपरी चिंचवड शहरात अनेक परवाना धारक व अनधिकृत होर्डिंग आहेत, पावसाळा देखील काही दिवसांवर आला असून , या पावसाळ्याच्या दिवसात वादळ व मुसळधार पावसाची शक्यता आहे अशातच काही होर्डिंगमुळे दुर्घटना घडू नये त्यासाठी खबरदारी म्हणून संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरातील होर्डिंग चे सुरक्षेचा द्रुष्टीने स्ट्रक्चर ऑडीट करण्यात यावे, व दोषीवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नाना काटे यांनी महानगरपालिका एका प्रसिद्ध पत्राद्वारे केली आहे

## लोहमार्ग पोलिसावरही गुन्हा दाखल करावा

**मुंबई** : घाटकोपर होर्डींग प्रकरणात लोहमार्ग पोलीसही तेवढेच जबाबदार आहेत. त्यामुळे मुंबई पोलिसांनी संबंधित लोहमार्ग पोलीस अधिकारी वर्गावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी महाराष्ट्र शासन आणि मुंबई पोलीस आयुक्तांकडे केली आहे.

लोहमार्ग पोलिस परवानगी देते भाडे घेत असल्याने त्यांची जबाबदारी अधिक आहे. घाटकोपर होर्डींग दुर्घटनेत निष्पाप लोकांचा बळी गेला आहे. पोलिसांनी जाहिरात कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे. लोहमार्ग पोलिसांनी परवानगी दिली पण त्यासाठी पालिका प्रशासनाची परवानगी घेतली गेली नाही उलट पालिकेने मागील वर्षी या होर्डींग प्रकरणात कारवाई करण्यासाठी लेखी पत्र पाठविले होते. मुंबईत ४0 बाय ४0ची होर्डींग परवानगी पालिका देते पण कोसळलेल्या होर्डींग चा आकार १२0 बाय १२0 चा होता. ७ डिसेंबर २0२१ रोजी लोहमार्ग पोलिसांनी एगो मीडिया कंपनीस कंत्राट दिले होते. याप्रकरणी चौकशी करत संबंधित लोहमार्ग पोलीसअधिकारी वर्गावर कारवाई करण्याची मागणी गलगली यांची आहे.

## मनातून अजून कोरोना न गेलेल्या त्या मतदारांना विश्वास देण्याचे काम करत आहे : खासदार राहुल शेवाळे



**मुंबई** : कोरोना वैद्यकीय दृष्ट्या संपला असला तरी जनतेच्या मनातून अजून कोरोना गेला नाही. कोरोना नंतरची प्रथमच निवडणूक आहे. त्यांना राजकीय आरोप प्रत्यारोप करणाऱ्या पुढाऱ्यांचा राग आला आहे. मतदारांची मानसिक, आर्थिक, सामाजिक स्थिती गंभीर आहे. त्यांना सर्व बाजूंनी विश्वास देण्याचे काम प्रचारादरम्यान मी करत आहे. आणि मला खात्री आहे माझा मतदार मला पुन्हा निवडूण देणार आहे. असे मनोगत खासदार राहुल शेवाळे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित वार्तालाप कार्यक्रम दरम्यान व्यक्त केले.

नगरसेवक ते खासदार या प्रवासादरम्यान मुंबई मराठी पत्रकार संघ व इतर सर्व पत्रकारांनी मला मार्गदर्शन केले. मी केलेल्या कामाचे कौतुक केले. यामुळे आज भारतातील टॉप टेन खासदारापर्यंतचा टप्पा मी गाठला आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व मतदारांच्या प्रश्नासाठी सदैव तत्पर असल्याने मला दोन वेळा खासदार होण्याची संधी मिळाली.

आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी पुन्हा एकदा त्यांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मतदार देणार असल्याची प्रचिती प्रचारादरम्यान दिसत आहे. सर्व मतदार माझे प्रेमाने स्वागत करत आहेत यातच माझा विजय नक्की आहे असे शेवाळे यांनी यावेळी सांगितले.

धारावीत माझा जन्म झाला असल्याने धारावीचा व पर्यायाने मतदार संघाचा विकास करण्यासाठी विविध योजना आखल्या असून काही सुरू केल्या आहेत.

यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे,कार्यवाह संदीप चव्हाण, विश्वस्त राही भिडे उपस्थित होते.

## मनसे, एमआयएमची मते ठरणार निर्णायक

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे** : पुणे लोकसभा निवडणुकीत महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित या तिन्ही उमेदवारांत जोरदार लढत झाली. या निवडणुकीत विजयी उमेदवारांमध्ये मनसे आणि एमआयएमची निर्णायक ठरणार आहे. कोंढवा, वडगांवशेरी, येरवडा भागात मोठ्या प्रमाणात मतदान झाले आहे. काँग्रेस, भजप या दोन्ही पक्षांना या परिसरातून चांगले मतदान झाले आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघात एकूण २0 लाख ६१ हजार २७६ मतदार असून यामध्ये १0 लाख ५७ हजार ८७७ पुरूष मतदार, १0 लाख ३ हजार ७५ महिला मतदार आणि ३२४ इतर मतदार आहेत. त्यापैकी ११ लाख ३ हजार ६७८ जणांनी मतदानाचा हक्क बजाविला आहे. त्यामध्ये ५ लाख ८४ हजार ५११ पुरुष तर ५ लाख १९ हजार ७८ महिला आणि इतर ८९ जणांनी मतदान केले आहे.

पर्वती, पुणे क्यान्टोन्मेंट, कसबा पेठ, शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसला चांगले मतदान झाल्याची चर्चा सुरू आहे. महायुतीचे मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी जोरदार प्रचार केला. आता ४ जून रोजी निकाल लागणार आहे. वंचितचे वसंतराव मोरे यांनीही चांगली मते मिळविल्याची कुजबुज सुरू आहे. पुणे लोकसभा निवडणुकीत तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट चित्र आहे.

## 'संविधान हटाओ ' म्हणजे म्हणजे नेमकं काय रे भाऊ ?

**˘ दिवाकर शेजवळ**

संविधान हटवणार,हा विरोधकांचा भाजपवरील आरोप किंवा त्यांनी उठवलेली अफवा मुळीच नाही. काही भाजप नेत्यांनीच जाहीर केलेला तो इरादा - मनसुबा आहे.राज्यघटनेला हात कोणीही लावू शकत नाही, अशी ' गॅरंटी ' भाजपचे रिपब्लिकन मित्र देतात. तर, संविधान हटवण्याचा आरोप परतवून लावताना स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ' काँग्रेसने ८0 वेळा राज्यघटना बदलली ',असे सांगतात. इथे शब्दांचा खेळ आहे. ' बदलणे ' हे क्रियापद ' हटवणे ' ला समानार्थी क्रियापद आहे काय, या प्रश्नाचे उत्तर हमखास ' होय ' असेच मिळेल. उदा. कपडे बदलणे म्हणजे आधीचे अंगावरील कपडे काढून टाकणे होय.

पण ' बदल करणे ' या क्रियापदाचा अर्थ वेगळा आहे. ' मुख्यमंत्र्यांनी आपल्या आजच्या कार्यक्रमात बदल केला,' याचा अर्थ त्यात दुरुस्ती, सुधारणा किंवा फेररचना केली, असा त्याचा अर्थ




होतो. मुख्यमंत्र्यांनी तो कार्यक्रम ' बाद ' केला, असा त्याचा अर्थ मुळीच होत नाही. तो कार्यक्रम बाद केला तर त्याचा अर्थ होईल डायरीतूनच हटवला!

हे सारे उगडून सांगायचे कारण इतकेच की, हटवणे, बदलणे आणि बदल करणे या क्रियांमधील फरक लक्षात यावा. म्हणजे मोदी जेव्हा म्हणतात: ' काँग्रेसने राज्यघटना ८0 वेळा बदलली, त्याचा अर्थ घटना दुरुस्ती असा होतो. अन् तशी दुरुस्ती करण्यास संविधानाची अनुमती आहे. ( मात्र राजयघटनेच्या मूलभूत ढाचाला धक्का लावण्याची संमती मुळीच नाही!) पण बदलणे म्हणजे बादच करणे आणि बदल करणे म्हणजे सुधारणा - दुरुस्ती करणे. भाजपला यातील काय अभिप्रेत आहे, ते अनंतकुमार हेगडे यांनी जाहीररीत्या सांगितले आहे. असो.

' संविधान हटाव ' साठी चाचपणीचे पाहिले पाऊल भाजप सरकारने अटलबिहारी वाजपेयी यांच्या राजवटीतच उचलले होते. ते म्हणजे राज्यघटनेचा फेरआढावा घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती वेंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेला आयोग. अर्थात, संविधानाच्या मूलभूत ढाचाला अजिबात हात लावला जाणार नाही, अशी पूर्वअट वाजपेयी सरकारला घालूनच वेंकटचलय्या यांनी त्या आयोगाचे अध्यक्षपद स्वीकारले होते.

मग संविधान हटाव म्हणजे नेमके काय? त्यासाठी राजधर्म सांगणारा तो ग्रंथ बाद करून कोनाड्यात फेकून द्यावा, हे जरुरीचे नाही. प्रश्न आहे तो संविधानाच्या पालनाचा आणि त्यातील मूल्ये आणि तत्वे अंमलात आणण्याचा. त्याची अंमबजावणी हाणून पाडत राज्यघटनेचा पराभव करणारी प्रत्येक कृती ही

' संविधान हटाव ' चीच असते, हे लक्षात घेण्याची आजघडीला खरी गरज आहे. कारण सरकार कुणाचेही असो, अंमलबजावणीच्या पातळीवर ते राज्यघटनेला पराभूत करत असेल तर एक देखाव्याचा राष्ट्र ग्रंथ म्हणून संविधान निरार्थकच ठरेल!

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६0३५0९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१0५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

निवडक ठाणे

## मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ १८ मे रोजी नालासोपाऱ्यात!

**वसई :** पालघर लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचलेला आहे. केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे चाणक्य अमित शहा यांच्या वसई येथील विराट सभेनंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ १८ मे रोजी नालासोपाऱ्यात येत असल्याची माहिती भाजप वसई-विरार जिल्हा प्रसिद्धी प्रमुख मनोज बारोट यांनी दिली आहे. पालघर लोकसभेचे उमेदवार डॉ. हेमंत सावरा यांच्या प्रचारार्थ योगी आदित्यनाथ यांच्या जाहीर सभेचे आयोजन भाजपच्या वतीने नालासोपारा पश्चिम, श्रीप्रस्था रोड येथील (फनफिएस्टा थिएटर) जवळ असलेल्या स्व. श्रीमान बाळासाहेब ठाकरे क्रीडांगणावर सकाळी ११.३० वाजता करण्यात आले असल्याने वसई- विरार व पालघर जिल्यातील भाजप कार्यकर्त्यांसह समस्त हिंदुत्ववादी संघटनेत उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

## कर्जतमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**कर्जत :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यात अभिवादन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा हालिवली येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हालिवली जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र म्हात्रे यांच्या संकल्पनेतून हा जयंती उत्सव पार पडला. सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ शिंदे आणि रामदास बोराडे यांच्या सहकार्याने शालेय विद्यार्थीसह गावातून छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची पालखी मधून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी रामदास बोराडे यांच्या हस्ते श्रीफळ तर काशिनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील माहिती सांगितली. शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र म्हात्रे यांनी संभाजीराजे यांच्याविषयी सांगताना त्यांचे पराक्रम, शौर्य याचे अनेक किस्से मुलाना सांगितले. संभाजीराजांचा इतिहास ऐकताना विद्यार्थी इतिहासात रमलेले पाहायला मिळाले. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी राजे भोसले यांच्या जन्मोउत्सव पाळखी सोहळा आयोजित करण्यासाठी भुषण राणे, प्रमिला दिनकर, वंदना बोराडे, मनिषा बोराडे, अर्चना शिंदे, दर्शना बोराडे तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी यांचा सहभाग होता.

## २७ वर्षांपासून खुनाच्या गुन्ह्यांतील फरार आरोपी अटकेत



**भाईंदर :** भाईंदर येथे केलेल्या खुनाच्या गुन्ह्यांत २७ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला गुन्हे शाखा कक्ष -१ काशिमीरा यांनी अटक केली आहे.

भाईंदर पूर्व एम.आय. उद्योगनगर, वासुदेव इंडस्ट्रीयल इस्टेट, गाळा नं. बी/१५, येथे विजयसिंग व त्याचे दोन साथीदार रा. साईसागर बिल्डिंग, भाईंदर यांनी गटारात प्लास्टिक पिशवीतून बिल्डिंगवरून कचरा टाकला त्यामुळे फिर्यादी व त्यांचे साथीदार यांच्या अंगावर खराब पाणी पडले. त्यावरून बोलाचाली व धक्काबुक्की करून ५ ऑक्टोबर १९९७ रोजी दुपारच्या सुमारास धरमनाथ रामशंकर पांडे यांच्या डोक्यात बांबूचा फटका मारून जबर दुखापत करून जीवे ठार मारले होते. याप्रकरणी प्रमोदकुमार सुताराम पांडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भाईंदर पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

या गुन्ह्यांचे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे. या गुन्ह्यात आरोपी विजयसिंग श्रीरामचंद्र चौहाण याला ५ ऑक्टोबर १९९७ रोजी अटक करण्यात आले होते. या गुन्ह्यात मेवालाल ऊर्फ पन्नालाल मुरत चौहाण (संशयीत) हे पाहीजे आरोपी होते.

# अखेर उमटे धरणातील गाळ काढणार

**सीएफटीआयला दिली प्रशासनाने परवानगी** | **नागरिकांना मिळणार शुध्द पाणी**



नवशक्ति marathi.freepressjournal.in इम्पॅट

**धनंजय कवठेकर/अलिबाग**

उमटे धरणाचा मागील ४६ वर्षांपासून गाळच काढलेला नव्हता. त्यामुळे धरणावर अवलंबून असणाऱ्या गावांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. उमटे धरणाचा गाळ काढण्यास शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे शासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय स्थानिकांनी घेतला असल्याची बातमी मंगळवारी (दि. १५ मे) रोजी 'दै. नवशक्ति'मध्ये छापण्यात आली होती. त्याची जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दखल घेत उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी सेंटर फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया या सामाजिक संस्थेला (सीएफटीआय) परवानगी दिली आहे. त्यामुळे आता धरणातील गाळ काढून अलिबाग तालुक्यातील तब्बल ४४ गावांना शुध्द पाण्याचा पुरवठा होण्यास मदत होणार आहे.

उमटे धरणातील गाळ कित्येक वर्षापासून काढण्यात आला नव्हता. त्यामुळे ४४ गावातील नागरिकांना दूषित पाण्यावर अवलंबून रहावे लागत होते. याबाबत प्रशासनाकडे सातत्याने दाद मागण्यात आली होती. मात्र, प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे नागरिकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत होता. पाण्याची तहान भागवण्यासाठी महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती, तसेच येथील पर्यटन व्यवसायावर देखील पाण्याचा विपरीत परिणाम होत असल्याने यातून मार्ग काढावा, अशी विनंती उमटे धरण परिसरातील स्थानिकांनी केली होती.


शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी पिण्याच्या पाण्यासाठी आक्रमक भूमिका घेत मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांची २९ एप्रिल रोजी भेट घेतली होती. नागरिकांना शुध्द पाणी द्या, शासनामार्फत धरणातील गाळ काढा अन्यथा आम्हाला तो गाळ काढण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी चित्रलेखा पाटील यांनी केली होती, त्यांच्या मागणीला आज यश आले आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड आणि कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांनी सेंटर फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया या सामाजिक संस्थेला (सीएफटीआय) त्यांच्या सीएसआर फंडातून १४ मे रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे.

> उमटे धरणातून अशुध्द पाण्याचा पुरवठा होत होता. आता गाळ काढण्याला परवानगी मिळाली आहे. लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. पावसाळ्यानंतरही गाळ काढण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. ग्रामस्थांना कायमस्वरूपी शुध्द पाणी देण्याचा आमचा प्रयत्न राहील. याबाबत प्रशासन, उमटे धरण परिसरातील ग्रामस्थ, उमटे धरण संघर्ष ग्रुप, अॅड. राकेश पाटील, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यासह अन्य सर्वांचे आभार व्यक्त करते.
>
> **- चित्रलेखा पाटील**, शेकाप जि. महिला आघाडी प्रमुख

गाळ काढण्यासाठी परवानगी मिळावी. यासाठी गेल्या महिनाभरापासून शेकापमार्फत पाठपुरावा करण्यात येत होता, अखेर त्याला यश आले आहे. संबंधित संस्थेमार्फत लवकरच गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. पोकलेन, जेसीबी, ट्रक यासह अन्य यंत्रसामुग्री प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील, नृपाल पाटील उपलब्ध करून देणार आहेत. परिसरातील ४४ गावांनी श्रमदान करण्यासाठी पुढाकार घ्यावा, तसेच आवश्यक असणारी यंत्रसामुग्री उपलब्ध करून श्रमदान करावे, असे आवाहन उमटे धरण संघर्ष ग्रुपने केले आहे.

> शेकाप नेहमीच सामाजिक उपक्रमात पुढे राहीला आहे. उमटे धरणातील गाळ काढण्याचा प्रश्न बऱ्याच कालावधीपासून प्रशासनामार्फत रेंगाळला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणातील नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे. गाळ काढण्यासाठी मी पोकलेन, जेसीबी यासह अन्य आवश्यक साहित्य देणार आहे. तालुक्यातील अन्य व्यावसायिकांनी देखील या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे.
>
> **- प्रशांत नाईक**, माजी नगराध्यक्ष अलिबाग

गेल्या काही वर्षांपासून प्रशासनाने याबाबत कानाडोळा केला होता, त्यामुळे जनतेला दूषित पाण्याचा वापर करावा लागत होता. आता मात्र, शेकापने केलेल्या पाठपुराव्यामुळे गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. शेकापच्या जनतेप्रती असलेल्या आत्मीयतेबाबत आम्ही अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील, नृपाल पाटील यांचे आभार व्यक्त करतो, असे अॅड. राकेश पाटील, अॅड. कौस्तुभ पुनकर यांनी सांगितले.



## नागोठणे येथील वाकण नाका येथे बर्निंग कारचा थरार

**नागोठणे :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका नित्यनेमाने सुरू असतानाच नागोठणेजवळील वाकण नाका येथे मारुती सीएनजी कारने अचानक पेट घेतल्याने बर्निंग कारचा थरार पाहायला मिळाला. या कारमधील चार प्रवासी हे कार रस्त्याच्या बाजूला उभी करून नाश्ता करण्यासाठी हॉटेलमध्ये गेलेले असल्याने तसेच कारला आग लागल्याचे समजताच कारमध्ये बसलेल्या एका मुलीला तात्काळ बाहेर काढल्याने दैव बलवत्तर म्हणून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. हा अपघात बुधवारी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास घडला. मात्र ही आग नक्की कशामुळे लागली याचे कारण समजू शकलेले नाही.

**सुदैवाने जीवितहानी टळली**

यासंदर्भात मिळालेल्या अधिक माहितीनुसार सायन-मुंबई येथील खरात कुटुंबीय आपल्या मारुती सुझुकी कंपनीच्या डिझायर कारमधून खोपोली, पाली मार्गे गणपतीपुळे येथे फिरण्यासाठी चालले होते. कारमध्ये किशोर खरात, कांचन किशोर खरात, साक्षी खरात (२३), गार्गी खरात (१६) व कारचालक दत्तात्रेय पवार असे पाच जण होते. खरात कुटुंबीय वाकण नाका येथे आले असता ते नाश्ता करण्यासाठी वाकण येथील एका हॉटेलमध्ये थांबले होते. मात्र यावेळी साक्षी खरात ही कारमध्येच होती. याचवेळी कारच्या इंजिनने अचानक पेट घेतले.

कार शेजारीच सुतारकाम करणाऱ्या महिलेच्या लक्षात येताच त्यांनी कारमधील साक्षीला तात्काळ बाहेर येण्यास सांगितले. यानंतर थोड्याच वेळात संपूर्ण कारने पेट घेतली. या अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अपघाताचा पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे सपोनि. हरेश काळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे. कॉ. गणेश भोईर करीत आहेत.

## गायी चोरल्याच्या संशयावरून अज्ञात व्यक्तीची हत्या

**नवी मुंबई :** गायी चोरल्याच्या संशयावरून तुर्भे एमआयडीसीतील तबेलाचालक पिता-पुत्राने एका अज्ञात व्यक्तीला आपल्या तबेल्यात आणून त्याला ५ तास वेगवेगळ्या हत्याराने बेदम मारहाण केल्याची गटना घटना मंगळवारी दुपारी घडली. या मारहाणीत सदर अज्ञात व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी तबेलाचालक पिता-पुत्रासह त्यांना या कामात मदत करणाऱ्या रिक्षाचालकाला हत्येच्या गुन्ह्यात अटक केली आहे.

**पिता-पुत्रासह तिघे अटकेत**

या प्रकरणातील मृत व्यक्तीचे नाव ठाकूर (४५) असे असून तो मूळचा उत्तर प्रदेश राज्यातील आहे. फिरस्ता असलेला ठाकूर हा वेगवेगळ्या ठिकाणी राहत होता, ठाकूर म्हणून त्याला सर्व ओळखत होते. सहा ते सात महिन्यांपूर्वी ठाकूर हा तुर्भे एमआयडीसीतील महात्मा गांधी नगर झोपडपट्टीत राहत असताना त्याने आरोपी उमाशंकर गौड याच्या तबेल्यातून तीन गायी चोरून त्याची परस्पर विक्री केली होती. याबाबतची माहिती तबेलाचालक उमाशंकर गौड याला मिळाल्यानंतर उमाशंकर व त्याचा मुलगा जयप्रकाश गौड हे दोघेही मंगळवारी महापे एमआयडीसीतील अडवली भुतवली येथील पारधी वस्तीत गेले होते.

तेथून त्यांनी ठाकूरला जबरदस्तीने नागेश इंगळे याच्या रिक्षामधून तुर्भे महात्मा गांधी नगर येथील आपल्या तबेल्यात नेले. त्याठिकाणी तबेलाचालक पिता-पुत्रांनी ठाकूरला वेगवेगळ्या हत्याराने तब्बल ५ तास बेदम मारहाण केली. या मारहाणीत ठाकूर गंभीर जखमी झाल्यानंतर या पिता-पुत्रांनी त्याला सायंकाळी पुन्हा त्याच रिक्षामधून अडवली भुतवली येथील पारधी वस्तीत आणून टाकून दिले. मात्र काही वेळातच त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या चौकशीत तबेलाचालक पिता-पुत्रांनी केलेल्या मारहाणीत ठाकूर याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी उमाशंकर गौड व त्याचा मुलगा जयप्रकाश गौड व रिक्षाचालक नागेश इंगळ या तिघांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून रात्री उशीरा या तिघांना अटक केली.

## सात लाखांची रोकड जप्त

**डोंबिवली :** कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण (पूर्व) विधानसभा मतदारसंघाच्या एसएसटी पथकाने मंगळवारी ७ लाख रुपयाची संशयास्पद रोख रक्कम जप्त केली. कल्याण (पूर्व) रेल्वे स्थानक येथून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांची तपासणी करून त्यांच्याकडे आढळलेल्या बेकायदेशीर वस्तू जप्त करून कायदेशीर कारवाई करण्यासाठी सदर एसएसटी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.

कल्याण (पूर्व) रेल्वे स्थानक येथे एसएसटी पथकातील कर्मचारी प्रवासी ब्रीजवरील तिकीट कांऊटरजवळ प्रवाशांच्या सामानाची तपासणी करीत असताना जयेश पोटे याच्याकडे असलेल्या बॅगेत ७ लाखांची रक्कम आढळून आली. याबाबत चौकशी केली असता एसएसटी पथकाला उचित उत्तर न मिळाल्याने कल्याण लोहमार्ग पोलीस स्टेशन, कल्याण (पश्चिम) यांच्या ताब्यात देण्यात आले. याप्रकरणी अधिक चौकशी करण्यात येणार असल्याची एसएसटी पथकाचे पथकप्रमुख दिपेश राठोड यांनी दिली.

## मोदींच्या सभेचे निमंत्रण नसल्याने जिल्हाप्रमुखाचा राजीनामा

**डोंबिवली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कल्याण येथे बुधवारी जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांना व्यासपीठावर निमंत्रण देण्यात आले नव्हते. सभेत आपल्याला मानसन्मान दिला नसल्याने मोरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पदाचा राजीनामा दिला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात २० मे रोजी पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई दक्षिण अशा एकूण १३ मतदारसंघात मतदान होणार आहे. निवडणुकीचा हा शेवटचा टप्पा असल्यामुळे महाराष्ट्रभर पंतप्रधान मोदी यांनी जाहीर सभा घेतली.

पंतप्रधान मोदी यांची कल्याणमध्ये भव्य सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा कल्याण पश्चिम येथील व्हरटैक्स मैदानातील आधारवाडी जेल चौक येथे आयोजित करण्यात आली असून या सभेत महायुतीचे अनेक बडे नेते, कार्यकर्ते त्याचबरोबर पदाधिकारी उपस्थित होते. मात्र या सभेच्या काही तासांपूर्वीच कल्याण-मुरबाडमधील शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी राजीनामा दिला.



> मी या कल्याण-मुरबाड शहराचा जिल्हाप्रमुख असूनही व्यासपीठावर निमंत्रितांमध्ये माझे नाव नाही. मात्र महायुतीच्या या सभेसाठी व्यासपीठावर ९२ जणांना आमंत्रित करण्यात आले. मला डावलले असल्यामुळे मी माझ्या पदाचा राजीनामा दिला आहे. जिल्हाप्रमुख हे सेनेमध्ये मानाचे पद आहे, पण जर माझ्या पदाला मान - सन्मान मिळत नसेल तर मग पद कशाला?
>
> **- अरविंद मोरे**, जिल्हाप्रमुख



## महापारेषणच्या कानसई सबस्टेशनमध्ये अग्नितांडव

**नागोठणे :** रोहा तालुक्यातील नागोठणेजवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील कानसई येथील महाराष्ट्र राज्य विद्युत महापारेषणच्या ४०० केव्ही क्षमता असलेल्या सबस्टेशनमध्ये आग लागल्याचा प्रकार मंगळवारी घडला. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले. यावेळी अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी ही आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागले. या आगीत लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. याआधीही अनेकदा या सबस्टेशनमध्ये आग लागण्याच्या घटना घडल्या असतानाच अचानक लागलेली ही आग कशामुळे लागली, याचे कारण आधी प्रमाणेच आताही गुलदस्त्यात आहे.

याबाबतीत उपलब्ध माहितीनुसार नागोठणे जवळील कानसई येथील महापारेषणच्या ४०० केव्ही सबस्टेशनमध्ये मंगळवारी अचानक आग लागल्याचे येथील ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. कर्मचाऱ्यांनी तात्काळ आग विझवण्याचा प्रयत्न केला, परंतु आग इतकी भयंकर होती की काही क्षणार्धातच आगीने रौद्ररूप धारण केले.

यावेळी वेळ न दवडता तात्काळ सबस्टेशन शेजारीच असलेल्या सुकेळी येथील जिंदाल कंपनीच्या अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. याचबरोबर काही वेळातच अग्निशामक दलाच्या गाड्या कर्मचाऱ्यांसह कानसई येथे दाखल झाल्या. या चारही कंपनीच्या अग्निशामक दलाच्या मदतीने सुमारे २ ते ३ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण आणण्यात अग्निशामक दलाला यश मिळाले.

**९० पेक्षा अधिक होर्डिंग ओव्हरसाईज**


# ओव्हरसाईज होर्डिंग्ज पालिकेच्या रडारवर

**ठाणे :** ओव्हरसाईज होर्डिंग महापालिकेच्या रडारवर असून होर्डिंग मालकांविरुद्ध पालिकेच्या बैठकीत आक्रमक धोरण स्वीकारण्यात आले आहे. ठाण्यात ९० पेक्षा अधिक होर्डिंग हे दिलेल्या परवानगीपेक्षा ओव्हरसाईज असल्याचे उघडकीस आल्यानंतर आता यासर्व होर्डिंग मालकांना पालिका प्रशासनाच्या वतीने नियमावलीचा डोस देण्यात आला आहे. येत्या आठ दिवसांत हे सर्व ओव्हरसाईज होर्डिंग नियमात न आणल्यास अशा सर्व होर्डिंगवर कारवाई करण्याचा इशारा पालिका प्रशासनाने बुधवारी झालेल्या महत्वाच्या बैठकीमध्ये दिला आहे.

मुंबईत होर्डिंग्ज पडून झालेल्या दुर्घटनेनंतर आता ठाणे महापालिकेला जाग आली आहे. त्यानुसार ठाण्यात अशा प्रकारची हानी होऊ नये, या दृष्टीने बुधवारी महापालिकेच्या माध्यमातून ठाण्यातील जाहिरातदारांची (होर्डिंग्ज) बैठक घेण्यात आली. या बैठकीत पुढील आठ दिवसात स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल सादर करण्याचे निर्देश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिले आहेत. तसेच होर्डिंग्जबाबत जी नियमावली ठरवून देण्यात आली आहे. त्याचे पालन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत.

ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रोडे यांच्या उपस्थितीत महापालिका मुख्यालयात ही बैठक घेण्यात आली. या बैठकीत हे निर्देश देण्यात आले आहे. महापालिका हद्दीत आजच्या घडीला ३०० च्या आसपास होर्डिंग्ज आहेत. परंतु ९० ठिकाणी दिलेल्या परवानगी पेक्षा अधिकच्या आकाराचे म्हणजेच ओव्हरसाईज होर्डिंग्ज उभारण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. ज्या ज्या जाहिरातदारांनी ओव्हरसाईज होर्डिंग्ज उभारले आहे. त्यांनी ते आठ दिवसाच्या आत नियमात आणावे अन्यथा कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यापूर्वी देखील स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. परंतु आता पुन्हा पुढील आठ दिवसात ऑडिट अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय जाहिरात धोरणातील नियमांचे पालन करावे अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत.

### होर्डिंग्जबाबतची नियमावली



होर्डिंग्जबाबत पालिका प्रशासनाच्या नियमावलीमध्ये २० फुटापर्यंत होर्डिंग्ज असावे, रस्त्याच्या अथवा फुटपाथच्या कडेला रस्त्यावर होर्डिंग्ज असू नये, कोणते रंग असावेत कोणते असू नयेत, अश्लील मजकूर प्रसिध्द होऊ नये, फुटपाथ पासून चार फूट आतमध्ये होर्डिंग्ज असावे, नागरिकांच्या तक्रारी असल्याने त्या ठिकाणी होर्डिंग्ज उभारण्यात येऊच नये तसेच दोन होर्डिंग्जमध्ये किती अंतर असावे, याची माहिती सुध्दा पालिकेने दिलेली आहे. अशी १८ नियमांची ही नियमावली आहे. आता याच नियमावलीची आठवण जाहिरातदारांना करून देण्यात आली आहे. आता त्याचे पालन होणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### काय आहे जाहिरात धोरण?

ठाणे महानगरपालिकेच्यावतीने २००३ च्या शासन जाहिरात धोरणानुसार जाहिरात फलक उभारणीस परवानगी देण्यात येते. यापुढे जाहिरात फलक लावण्यासाठी परवानगी देताना शहराच्या सौंदर्यास बाधा येणार नाही, अशा पद्धतीने परवानगी देणे, किती क्षेत्रफळामध्ये आणि किती आकाराचे होर्डिंग उभा करता येईल, किती अंतरावर परवानगी देता येईल याबरोबरच न्यायालयाच्या निदेर्शांचे पालन करणे, नागरिकांच्या दृष्टीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेणे असे सर्वसमावेशक धोरण तयार करण्यात आले आहे.

## बदलापुरात होर्डिंग्जचे होणार स्ट्रक्चरल ऑडिट



**बदलापूर:** घाटकोपर दुर्घटनेनंतर बदलापुरातील रस्तोरस्ती लागलेल्या मोठमोठ्या होर्डिंग्जचा प्रश्नही ऐरणीवर आला असून. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी शहरातील सर्व होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार असल्याचे नगर परिषद प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अविनाश देशमुख यांनीही यासंदर्भात निवेदन सादर करून तातडीने शहरातील सर्व होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी नगर परिषद प्रशासनाकडे केली आहे. शहरातील सर्व होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक अवस्थेत असलेले तसेच बेकायदेशीररित्या उभारण्यात आलेले अनधिकृत होर्डिंग्जही हटविण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी योगेश गोडसे यांनी स्पष्ट केले.

निवडक महामुंबई

## आरोग्य विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या परीक्षा १८ मेपासून

**मुंबई :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या पहिल्या टप्यातील वैद्यकीय विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या लेखी परीक्षेला १८ मे २०२४ पासून प्रारंभ होणार आहे. राज्यातील एकूण ३९ परीक्षा केंद्रावर या परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेत एम.बी.बी.एस. (ओल्ड / सीबीएमई-२०१९) पदवी व वैद्यकीय पदव्युत्तर विद्याशाखांचे सुमारे ३ हजार १८८ विद्यार्थी प्रविष्ठ होणार आहेत. या परीक्षा ३ जून २०२४ पर्यंत घेण्यात येणार असल्याचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी स्पष्ट केले. यावेळी उत्तर पत्रिकांचे त्याच दिवशी संबंधित परीक्षा केंद्रांवर स्कॅनिंग करून केंद्रीय मूल्यांकन केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने मुल्यमापन केले जाणार आहे. परीक्षेबाबतची अधिक माहिती विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ www.muhs.ac.in वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## 'संगीत से सनातन की यात्रा'चा शुभारंभ

**मुंबई :** भारताच्या पिवळ्या क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी प्रसिद्ध असलेले डॉ. दिनेश शाहरा यांच्या 'संगीत से सनातन की यात्रा' या उत्कृष्ट अभिनव पॉडकास्टचा शुभारंभ १५ मे रोजी करण्यात आला. या अनोख्या उपक्रमाद्वारे भारतीय संगीत जगतातील नामवंत व्यक्तींशी चर्चा केली जाणार आहे. या प्रसिद्ध पाहुण्यांमध्ये भजनगायक अनुप जलोटा, पद्मश्री अनुराधा पौडवाल, प्रसिद्ध गायिका मधुश्री आणि प्रसिद्ध सितारवादक पूरबायन चॅटर्जी यांचा समावेश आहे. पारंपरिक पॉडकास्टच्या विपरीत, 'संगीत से सनातन की यात्रा' संगीत आणि सनातनच्या प्राचीन तत्त्वांमधील संबंध शोधेल. सशक्त पार्श्वभूमीसाठी ओळखले जाणारे डॉ. दिनेश शाहरा, संगीतातील सनातनच्या तत्त्वांच्या महत्त्वावर भर देतात, जे 'वसुदैव कुटुंबकम' - 'एक जग, एक कुटुंब' या श्रद्धेवर आधारित आहे.

## बोरिवलीतील आत्महत्येप्रकरणी १२ जणांवर गुन्हा

**मुंबई :** बोरिवलीतील आत्महत्येप्रकरणी अखेर पोलिसांनी १२ जणांविरुद्ध बोरिवली आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. ६ मे रोजी एका शेअर ट्रेडरचा मृतदेह सापडला होता, त्याने विष प्राशन करबन आत्महत्या केली होती. गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये निधी श्रीवास्तव, शोभित श्रीवास्तव, राहुल पटेल, तृप्ती पटेल, संतोष पटेल, ज्योती शर्मा, अनिता चिन्नरी, भावना, प्रिया, मनीषा, लक्ष्मी आणि डॉ. संतोष शेगडे यांचा समावेश आहे. ६ मे रोजी तेजस गज्जर हे बोरिवलीतील गोराई रोड, बीएसएनएल रहिवाशी वसाहतीच्या मागील बाजूस मृतावस्थेत सापडले होते. याप्रकरणी बोरिवली पोलिसांनी एडीआरची नोंद करून तपास सुरु केला होता. यावेळी त्यांच्या खिशात पोलिसांना एक सुसाईड नोट सापडली होती. या नोटमध्ये संबंधित १२ जणांचा उल्लेख होता, त्यात त्यांनी केलेल्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून त्यांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे नमूद केले होते. तपासात संबंधित आरोपी तेजसच्या परिचित असून यातील काही आरोपी त्यांच्याच सोसायटीचे रहिवाशी आहेत. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केल्यानंतर या १२ आरोपींविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## दागिन्यांच्या पेमेंटच्या अपहार प्रकरणी अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा

**मुंबई :** दागिन्यांच्या पेमेंटचा अपहार केल्याप्रकरणी एका खासगी कंपनीच्या अधिकाऱ्याविरुद्ध साकीनाका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विशाल भारतीय असे या अधिकाऱ्याचे नाव असून त्याच्यावर ३० लाखांचा अपहार करून कंपनीची फसवणूक केल्याचा आरोप आहे. यातील तक्रारदार अंधेरीतील एका खासगी कंपनीत जनरल मॅनेजर म्हणून काम करतात. ही कंपनीत मुंबईसह महाराष्ट्र आणि देशभरात विविध ग्राहकांना सोन्या-चांदीचे दागिने विक्री करते. याच कंपनीत विशाल हा गेल्या सात वर्षांपासून कामाला होता. डिसेंबर २०२३ पर्यंत त्याने विक्री केलेल्या सर्व दागिन्यांचे पेमेंट कंपनीच्या बँक खात्यात जमा केले होते. मात्र जानेवारी २०२४ पासून त्याच्याकडून पेमेंट जमा होण्यास विलंब होऊ लागला होता. याबाबत विचारणा करूनही तो टाळण्याचा प्रयत्न करत होता. फसवणुकीचा हा प्रकार उघडकीस येताच कंपनीच्या वतीने साकीनाका पोलिसात तक्रार करण्यात आली.

# वांद्रे ते मरीन ड्राईव्ह फक्त १२ मिनिटांत!



छाया : विजय गोहिल

## २.५ हजार मेट्रिक टन वजनाचा गर्डर लाँच | ३ तास ७ मिनिटांत मिशन फत्ते

**मुंबई :** मुंबईची वाहतूककोंडी फोडण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या कोस्टल रोड प्रकल्पातील आव्हानात्मक टप्प्यातील अडीच हजार मेट्रिक टन वजनाचा 'बो स्ट्रिंग आर्च गर्डर' बुधवारी पहाटे यशस्वीपणे बसवण्यात आला. विशेष म्हणजे, ३ वाजता सुरू झालेले हे काम ६ वाजून ७ मिनिटांनी संपले. याचाच अर्थ, ३ तास ७ मिनिटांत दुसरा गर्डर बसवण्याचे मिशन फत्ते झाले. समुद्रातील भरती व ओहोटीचे चॅलेंज स्वीकारत दुसरा गर्डर यशस्वीपणे बसवण्यात आल्याने अभियांत्रिकी आविष्कार घडला आहे. पहिला बो स्ट्रिंग आर्च गर्डर २६ एप्रिल रोजी बसवण्यात आला, तर दुसरा गर्डर बुधवार १५ मे रोजी बसवण्यात आल्याने पुढील दीड महिन्यांत वांद्रे ते मरीन ड्राईव्ह दरम्यानचा प्रवास फक्त १२ मिनिटांत करणे शक्य होणार असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

मुंबई महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणजेच कोस्टल रोडच्या कामाची ऑक्टोबर २०१८ मध्ये सुरुवात झाली. कोस्टल रोड प्रकल्प एकूण १०.५८ किलोमीटर लांब असून मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील अतिशय आव्हानात्मक टप्पा म्हणजे मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू मार्गाची सांधणी. त्यासाठी पालिका प्रशासनाने अतिशय नियोजनबद्ध तयारी केली आहे. या दोन्ही टोकांना सांधणारी पहिली तुळई (बो आर्च स्ट्रिंग गर्डर) बुधवार, २४ एप्रिल २०२४ रोजी दुपारी १२.३० मिनिटांनी माझगाव डॉक येथून मार्गस्थ झाली आणि गुरुवार २५ एप्रिल रोजी पहाटे चार वाजता वांद्रे-वरळी सागरी सेतूजवळ पोहोचली. शुक्रवारी पहाटे सव्वा तासांत बो स्ट्रिंग आर्च गर्डर यशस्वीपणे बसवण्यात आला. तर दुसऱ्या टप्प्यातील बो स्ट्रिंग आर्च गर्डर बुधवार १५ मे रोजी पहाटे ६ वाजून ७ मिनिटांनी बसवण्यात आला. या जोडणीमुळे मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू मार्ग एकमेकांना पूर्णपणे जोडले गेले आहेत.

पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी मुंबई मेट्रो रेल्वेच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे, अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, उपआयुक्त (विशेष अभियांत्रिकी) चक्रधर कांडलकर, प्रमुख अभियंता (मुंबई किनारी रस्ता प्रकल्प) गिरीश निकम, उपप्रमुख अभियंता मांतय्या स्वामी, 'एचसीसी'चे अध्यक्ष अजित गुलाबचंद, उपाध्यक्ष अर्जुन धवन, मोहिमेचे प्रमुख संतोष राय आदींसह अभियंते, अधिकारी, कर्मचारी, कामगार उपस्थित होते.

### दुसरी तुळई वजन, लांबी-रुंदीने मोठी

मुंबई किनारी रस्त्यावर स्थापन करण्यात आलेल्या पहिल्या तुळईपेक्षा तुलनेने दुसरी तुळई ही वजनाने, लांबी-रुंदीने मोठी आहे. दुसरी तुळई ३१.७ मीटर रुंद, ३१ मीटर उंच आणि १४३ मीटर लांब आहे, तर वजन अडीच हजार मेट्रिक टन आहे. अंबाला (हरियाणा) येथे या तुळईचे लहान सुटे भाग तयार करण्यात आले आहेत. पहिल्या तुळईपासून केवळ २.८ मीटर अंतर फरक लक्षात घेता, दुसरी तुळई स्थापन करणे आव्हानात्मक होते. न्हावा बंदरातील माझगाव गोदी केंद्रातून रविवार १२ मे २०२४ रोजी सकाळी दुसरी तुळई घेवून तराफा (बार्ज) निघाला होता.

### म्हणून आत्मविश्वास वाढला

याआधी, प्रवाहकीय हवामानानुसार अंदाज घेऊन २६ एप्रिल रोजी पहिली तुळई स्थापन करण्यात आली होती. तो अनुभव गाठीशी असल्याने दुसरी तुळई स्थापन करण्यासाठी मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाच्या पथकाचा आत्मविश्वास दुणावला होता. बुधवारी पहाटे ३ वाजेपासून ही मोहीम सुरू करण्यात आली. प्रवाहकीय हवामानाचा अंदाज घेत टप्प्याटप्प्याने ही तुळई आधी स्थापन केलेल्या पहिल्या तुळईकडे सरकविण्यात आली. चारही बाजूचे कोन तंतोतंत जुळल्यानंतर पहाटे ६ वाजून ७ मिनिटांनी अडीच हजार मेट्रिक टन वजनाची तुळई यशस्वीपणे जोडण्यात आली.

### सावधानता अन् उत्सुकता

पहिली तुळई बसविताना आजूबाजूला मोकळी जागा असल्याने अभियंत्यांना अंदाज घेण्यासाठी पुरेसा वाव होता. परंतु बुधवारी दुसरी तुळई स्थापन करताना तितकीशी मोकळीक नव्हती. पहिल्या तुळईचा अंदाज घेत, अतिशय सावधपणे ही मोहीम पार पाडण्याचे मोठे आव्हान होते. पहिल्या तुळईपासून अवघ्या २.८ मीटर अंतरावर दुसरी तुळई स्थापन करणे काहीसे जोखमीचे होते. परंतु या प्रकल्पावर काम करणारे अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी आणि कामगार यांनी अतिशय कुशलतेने ही मोहीम पार पाडली. मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू दरम्यान स्थापन करण्यात आलेल्या दोन्ही तुळईवर पुढील टप्प्यात सिमेंट क्राँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या तुळईला गंज चढू नये यासाठी सी-५ या जपानी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

# तीन महिने उलटले तरी वाढीव विद्यावेतनची प्रतीक्षा

**इंटर्न डॉक्टर आंदोलनाच्या पवित्र्यात**

**मुंबई :** राज्यातील महाविद्यालयांतील सगळ्या इंटर्न डॉक्टरांच्या विद्यावेतनात ७ हजारांनी वाढ करत ११ हजारांहून १८ हजार रुपये केल्याचा निर्णय राज्य सरकारने २७ फेब्रुवारी रोजी जाहीर केला. राज्य सरकारच्या निर्णयाची जेजे रुग्णालयासह राज्यातील अन्य महाविद्यालयात अंमलबजावणी करण्यात आली. मात्र तीन महिने उलटूनही पालिकेच्या महाविद्यालयात वाढीव विद्यावेतन लागू करण्यात आलेली नाही. पालिकेच्या वेळकाढूपणामुळे इंटर्न डॉक्टरांमध्ये नाराजी असून ते पुन्हा एकदा आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

वाढीव विद्यावेतन मिळावे, यासाठी पालिकेसह राज्यातील महाविद्यालयांतील निवासी डॉक्टरांनी अनेकदा आंदोलन केले. मात्र प्रत्येक वेळी आश्वासनावर बोळवण करण्यात आली. अखेर जानेवारी महिन्यात तीव्र आंदोलनाचा इशारा इंटर्न डॉक्टरांनी दिला होता. त्यानंतर २७ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाने एक शासन निर्णय जाहीर केला. त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासितांसाठी विद्यावेतन ११ हजारावरून १८ हजार रुपये इतके करण्यात आले आहे. मात्र पालिकेच्या महाविद्यालयातील आंतरवासितांना अद्यापही ११ हजार रुपये प्रतिमहा इतकेच वेतन मिळत आहे. महाराष्ट्रातील अन्य सर्व महाविद्यालयात उदा. जेजे रुग्णालय, बारामती, अंबेजोगाई, औरंगाबाद, यवतमाळ इत्यादी सर्व महाविद्यालयांमधील आंतरवासितांना २७ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णय जाहीर झाल्यापासून प्रतिमहा १८ हजार रुपये विद्यावेतन मिळत आहे. मात्र पालिकेच्या महाविद्यालयात अंमलबजावणी नाही, असे निवासी डॉक्टरांच्या संघटनेकडून सांगण्यात आले आहे.

"आंतरवासितांच्या विद्यावेतन वाढीबाबत पालिकेच्या निर्णयातील दिरंगाईबाबत सर्व आंतरवासितांमध्ये नाराजी आहे," असे असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स या संघटनेचे सदस्य डॉ. जीशान बागवान म्हणाले. तसेच यासंदर्भात महापालिकेच्या सर्व वैद्यकीय महाविद्यालयांकडून एक सामाईक पत्र वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. नीलम अंद्राडे यांच्याकडे सुपूर्द केले आहे.

### एकूण ८०३ इंटर्न वाढीच्या प्रतीक्षेत!

महापालिकेच्या ५ वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एकूण ८०३ आंतरवासिता आहेत. यामध्ये नायरमध्ये १४४, केईएम मध्ये २४०, सायनमध्ये १८४, कूपरमध्ये १७३, नायर डेंटलमध्ये ६२ आंतरवासिता आहेत. हे सर्व ८०३ इंटर्न विद्यावेतन वाढीच्या प्रतीक्षेत आहेत.

# उज्ज्वल निकम यांनी दहशतवादी हल्ल्याबाबत खुलासा करावा –प्रकाश आंबेडकर

**प्रतिनिधी/मुंबई**

मुंबईवर २६/११ चा दहशवादी हल्ला झाला. त्या हल्ल्यामागे देखील एक छुपा हल्ला आहे. ज्याने कोणी हल्ला केला त्याला माहिती होते की, पाकिस्तान हल्ला करणार आहे. याचा अर्थ त्याचा पाकिस्तानशी संबंध आहे. तो संबंध भाजप का उलगडत नाही? उज्ज्वल निकम यांना मी विनंती करतो की, कोणत्यातरी धार्मिक संघटनेला वाचवण्यासाठी, कोणत्या तरी व्यक्तीला वाचवण्यासाठी त्याकाळी आपल्यावर दबाव असेल. पण आता आपण लोकसभेचे उमेदवार आहात, तुमच्यावर आता कोणताही दबाव नाही. निकम यांनी आता याबाबत स्पष्टता करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केली. जनतेने उज्ज्वल निकम यांना विचारले पाहिजे की, तुम्ही राष्ट्राशी प्रामाणिक नाही तर आम्ही तुम्हाला का मतदान करावं? असाही सवाल त्यांनी केला.

मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्यात हेमंत करकरे, विजय साळसकर, अशोक कामटे यांचा जीव घेणाऱ्या गोळ्या कसाबच्या होत्या का की त्यांचा खून झाला? यासंदर्भात उज्ज्वल निकम यांनी सत्य सांगावे. हेमंत करकरे, साळसकर, कामटे यांचा हल्ल्यात गोळ्या लागून मृत्यू झाला होता. गोळ्या कोणाच्या होत्या कसाब किंवा अबू ईस्माईलच्या बंदुकातल्या होत्या का? यासंदर्भात निकम यांनी खुलासा करावा, अशी विनंती आपण केली होती. देशाशी इमान राखावा, यासाठी खुलासा करणे आवश्यक असल्याचे आंबेडकर म्हणाले.

आंबेडकर म्हणाले की, "मी उज्ज्वल निकम यांना आवाहन करतोय की, २६/११ मध्ये काय घडलं आहे? हे लोकांना प्रामाणिकपणे सांगावे. आपण सांगितलेली व्यक्ती आणि संघटना या देशात जयचंदचे काम करणार का, याबद्दल जनता निर्णय घेईल."

"निकम यांनी केस चालवली, त्यात दुमत नाही. कसाबला दोषी करण्यात आले होतं. आयपीएस अधिकाऱ्यांचादेखील खून झालाय, मात्र फायनल ऑर्डरमध्ये त्यांची नावंच नाहीयत. काही अधिकारी यात होते, त्यात कोर्टासमोर, ही माहिती का आणली नाही, हा प्रश्न आहे. कसाब आणि इस्माईलनं वापरलेल्या बंदुकीतून त्यांनी कुठल्यातरी धार्मिक संघटनेला वाचवण्यासाठी दबाव होता का?" असा सवाल आंबेडकरांनी उपस्थित केला आहे.

### एकीकडे मृत्यू, दुसरीकडे रोड शो



पंतप्रधान नरेंद्र मोदी घाटकोपरला रोड शो करायला आले. पण दोन दिवसांपूर्वी तिथेच एक मोठी दुर्घटना घडली. रोड शोआधी संबंधित दोषींवर कारवाई का नाही झाली? एका बाजूला लोक मरत आहेत. दुसरीकडे रोड शो होत आहे, अशा शब्दांत आंबेडकर यांनी पंतप्रधानांच्या रोड शोचाही समाचार घेतला.

# राज ठाकरेंमुळे महायुतीला बळ!

## गाठीभेटी वाढल्या, बावनकुळेंनी दिले महायुतीच्या रॅलीचे निमंत्रण

**विशेष प्रतिनिधी/मुंबई**

मनसेप्रमुख राज ठाकरे यांची राज्यात एक स्वतंत्र ओळख असून, त्यांचे कार्यकर्त्यांचे जाळे मोठे आहे. त्यांचे हे बळ यावेळी महायुतीच्या मागे लावण्यात आले असून, मुंबई, पुणे, नाशिकसह राज्यात बऱ्याच ठिकाणी याचा फायदा महायुतीला होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी बुधवारी राज ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या शिवतीर्थावर जाऊन राज ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्यामुळे महायुतीचे बळ वाढले असल्याचे मान्य केले. तसेच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी राज ठाकरे यांच्यासोबत चर्चा केली आणि १७ मे रोजी मुंबईत शिवाजी पार्कवर होणाऱ्या महायुतीच्या महारॅलीचे निमंत्रण दिले. याच रॅलीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज ठाकरे प्रथमच एकत्र येणार आहेत. त्याची उत्सुकता मुंबईकरांना आहे.

राज्यात अखेरच्या आणि पाचव्या टप्प्यातील मतदान २० मे रोजी होत आहे. मुंबईत अखेरच्या टप्प्यात मतदान होत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी १७ मे रोजी पुन्हा मुंबईत येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क येथे महाप्रचार रॅली आयोजित केली आहे. विशेष म्हणजे याच रॅलीत मनसेप्रमुख राज ठाकरेही सहभागी होणार असून, या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज ठाकरे एकाच व्यासपीठावर येणार असून, शिवाजी पार्कवर त्यांची महायुतीसाठी एकत्रित गर्जना होणार आहे. या महारॅलीची जोरदार तयारी सुरू केली असून, या रॅलीचे निमंत्रण राज ठाकरे यांना देण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे शिवतीर्थावर दाखल झाले होते. राज ठाकरे यांनी हे निमंत्रण स्वीकारले असून, ते या महारॅलीसाठी उपस्थित राहणार आहेत, असे बावनकुळे म्हणाले.

यावेळी मीडियाशी बोलताना बावनकुळे यांनी राज्याच्या निवडणुकीत मनसेप्रमुख राज ठाकरे यांचा नेहमीच महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे. मनसेचे राज्यात फार मोठे जाळे आहे. तसेच मुंबई, पुणे, नाशिकमध्येही त्यांची मोठी ताकद आहे. त्यामुळे महायुतीचे बळ वाढले आहे.

### नरेंद्र मोदी-राज ठाकरे यांच्या सभेचे आकर्षण

राज्यात पाचव्या आणि अंतिम टप्प्यातील निवडणूक आता २० मे रोजी होत आहे. महायुतीचे मुंबईवर विशेष लक्ष असल्याने अखेरच्या टप्प्यात मुंबईची निवडणूक ठेवली आहे. त्यामुळे महायुतीने जोरदार तयारी केली असून, याच पार्श्वभूमीवर १७ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या उपस्थितीत महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने शिवाजी पार्क येथे महायुतीचा शक्तिप्रदर्शनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे या राज्यातील अखेरच्या प्रचारसभेत मोदी आणि राज ठाकरे काय बोलणार, याची उत्सुकता अधिक असणार आहे.

'एनडीए'ला बहुमत मिळणार; देवेंद्र फडणवीस यांना विश्वास

# ठाकरे गटाचा पाठिंबा घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही!

**एस. बालकृष्णन :** लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचलेला असतानाच सर्वांचे लक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लागलेले आहे. महाविकास आघाडीशी दोन हात करताना फडणवीस हे महायुतीची धुरा सांभाळत आहेत. 'मेघदूत' या शासकीय निवासस्थानी फडणवीस यांनी निवडक पत्रकारांशी बातचीत केली. रिंगणात केवळ एकच उमेदवार असून त्यांचे नाव पंतप्रधान नरेंद्र मोदी असे आहे आणि विकसित भारत हे त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जनता मोठ्या प्रमाणावर त्यांच्या पाठीशी आहे, असे फडणवीस म्हणाले.

**प्रश्न :** पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात सातत्याने प्रचारासाठी का येत आहेत, निवडणुकीत कामगिरी चांगली होणार नाही, असा महायुतीला विश्वास वाटत नाही का ?

**उत्तर :** तसा कोणताही प्रकार नाही, २०१९ पेक्षा आम्ही अधिक चांगली कामगिरी करू, मोदींच्या सभांना राज्यभर



उदंड प्रतिसाद मिळत आहे, यावेळी भरपूर वेळ मिळाल्याने आम्ही जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहोत. विरोधी पक्षांच्या काही उमेदवारांचा १०० टक्के पराभव व्हावा, यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.

**प्रश्न :** अयोध्येत भव्य राम मंदिर उभारले त्याचा राजकीय लाभ मिळणार नाही, असे वाटते का ?

**उत्तर :** राम मंदिर हा भाजपचा कधीही राजकीय मुद्दा नव्हता. देशाच्या संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचा एक भाग म्हणून या प्रश्नाकडे आम्ही पाहतो, आम्ही निवडणुकीत याचा मुद्दा म्हणून वापर केला नाही. मात्र मोदी हे शब्दाचे पक्के आहेत, हा संदेश जनतेपर्यंत पोहोचला. राम मंदिर उभारण्याचे आश्वासन त्यांनी दिले आणि ते पूर्ण केले.

**प्रश्न :** उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबाला बिगर राजकीय मदत करण्याची तयारी मोदी यांनी अलीकडेच दर्शविली हा निवडणुकीनंतर शिवसेनेशी (उबाठा) संबंध प्रस्थापित करण्याचा संकेत आहे का?

**उत्तर :** हा त्याचा संदर्भ नाही, उद्धव ठाकरे यांच्यावर शस्त्रक्रिया झाली, तेव्हा मोदी उद्धव यांच्या सातत्याने संपर्कात होते. मोदी आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यात व्यक्तिगत संबंध होते आणि भावनिक नाते आजही आहे. बाळासाहेबांच्या विचारधारेपासून उद्धव दूर गेले हे दुर्दैव आहे. शिवसेनेचा (उबाठा) पाठिंबा घेण्याचा प्रश्नच नाही. कारण एनडीएला चांगले बहुमत मिळणार आहे. उद्धव मोदींवर वैयक्तिक हल्ले चढवत आहेत त्याची आम्ही दखल घेतली आहे. परंतु राजकारणात कोणीही भविष्य वर्तवू शकत नाही.

**प्रश्न :** भाजप आणि अविभक्त शिवसेना अनेक वर्षे एकत्र होती, त्यांच्यात समझोता शक्य आहे का ?

**उत्तर :** आम्ही आघाडी तोडली नाही, उद्धव यांच्या अहंकारामुळे आघाडी तुटली, जेव्हा एकनाथ शिंदे यांना बहुसंख्य शिवसेना आमदारांचा पाठिंबा आहे असे लक्षात आले, तेव्हा उद्धव यांना त्यांच्या पुत्राला मुख्यमंत्री करावयाचे होते, नारायण राणे यांच्याबाबतचा अनुभव चांगला नव्हता, त्यामुळे उद्धव यांना ठाकरे कुटुंबातील मुख्यमंत्री हवा होता आणि आदित्य ठाकरे हे त्यांचे उमेदवार होते.

**प्रश्न :** शिवसेनेत फूट पडण्यास तुम्ही कारणीभूत असल्याचे बोलले जाते ?

**उत्तर :** आपण शिवसेनेत फूट पाडली नाही, मुख्यमंत्रीपद पटकावण्याची उद्धव यांची महत्त्वाकांक्षा होती, त्यामुळे फूट पडली. शिंदे यांची शिवसेनेत गळचेपी होत होती आणि त्यामुळेच त्यांनी बाहेर पडण्याचे ठरविले. भाजप आणि शिंदे यांची शिवसेना बाळासाहेबांच्या विचारसरणीमुळे एकत्र आले. उद्धव यांनी मराठी माणसासाठी काय केले?

**प्रश्न :** ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या आशीर्वादाने यापूर्वी अजित पवार यांनी तुमच्याशी हातमिळवणी केली होती, असे स्वतः अजित पवार यांनीच सांगितले, शरद पवार भाजपच्या विरोधात कधीही नव्हते ?

**उत्तर :** शरद पवार यांनी अजित पवार यांना प्रोत्साहन दिले आणि नंतर माघार घेतली. अजित पवार यांना खलनायक ठरविण्याची ती खेळी होती, शरद पवार यांना केवळ त्यांची कन्या सुप्रिया सुळे यांना बढती देण्यात स्वारस्य होते.